# जिल्हा सहकारी मत्स्य व्यवसाय संघ मर्यादित,-----------

# पोटनियम

# जिल्हा सहकारी मच्छिमार संघ मर्यादित:-

## पोटनियम:

1.0 नाव, पत्ता व कार्यक्षेत्र:------------------------------------------------------------

1.1 हया संघाचे नाव:- ---- जिल्हा सहकारी मच्छिमार संघ मर्या. ---- असे असून यापुढे संघ या नावाने संबोधिल जाईल.

1.2 हया संघाचा नोंदलेला पत्ता: -------------- असा राहील. हया पत्त्यामध्ये कोणताही बदल झाल्यास तो संबंधित नोंदणी (अधिका-याला) व इतर संबंधितांना तीस दिवसाचे आत कळविला जाईल.

1.3 हया संघाचे कार्यक्षेत्र: --------------------- असे राहील.

## 2. व्याख्या:

2.1 **'संघ'** : हयाचा अर्थ --------- जिल्हा सहकारी मच्छिमार संघ मर्यादित, --------.

**2.2 'समिती ' जिच्याकडे संस्थेच्या कारभाराचे व्यवस्थापन सोपविण्यात आले असेल अशी त्या सहकारी संस्थेची व्यवस्थापन समिती किंवा**

**संचालक मंडळ किंवा नियामक मंडळ किंवा अन्य निदेशन निकाय मग तो कोणत्याही नावाने सभासदतंतर संबोधण्यात येवो.**

2.3 **"पदाधिकारी " म्हणजे कार्याध्यक्ष, उपकार्याध्यक्ष, अध्यक्ष, उपाध्यक्ष, व्यवस्थापन संचालक व्यवस्थापक, सचिव, कोषापास, समितीचा सदस्य आणि अशा संस्थेच्या कामकाजासंबंधी निदेश देण्यासाठी या अधिनियमान्वये नियमांन्वये किंवा उपविधीन्वये निवडून दिलेली किंवा नेमणुक केलेली इतर कोणतीही व्यक्ती, मग ती कोणत्याही नावाने संबोधण्यात येणे, या सारखा कोणताही पदाधिकारी.**

2.4 **" तज्ञ संचालक" याचा अर्थ, बँकिंग, व्यवस्थापन, वित्त व्यवस्था या क्षेत्रामधील अनुभव असलेली व्यक्ती, असा आहे. आणि त्यामध्ये संबधित संस्थेने हाती घेतलेली उद्दिस्टये व कार्ये यांच्याशी संबधित अन्य कोणत्याही क्षेत्रातील विशेषत: धारण करणा-या व्यक्तीचा समावेश होतो.**

2.5 **" सेवक"** संस्थेचे कामकाज पार पाडण्यासाठी नेमलेली पगारी व्यक्ती

2.6 **" कार्यलक्षी संचालक" याचा अर्थ, व्यवस्थापन संचालक किंवा मुख्य कार्यकारी अधिकारी मग तो कोणत्याही नावाने संबोधण्यात येणे, असा आहे. आणि त्यामध्ये, समितीने नामनिर्देशित केलेल्या संबधित संस्थेच्या कोणत्याही विभागाच्या प्रमुखाचा समावेश होतो.**

2.7 **" प्राधिकृत व्यक्ती" याचा अर्थ, अनुच्छेद** 243 **या मध्ये निर्दिष्ट केलेली व्यक्ती असा आहे आणि त्यामध्ये, या अधिनियमाच्या तरतुदींन्वये कार्यवाही**

**करण्यासाठी निबंधकाने यथोचितरित्या प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीचा समावेश होतो.**

2.8 “ **क्रियाशिल सदस्य" याचा अर्थ जो संस्थेच्या कारभारात भाग घेतो आणि उपविधीमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा संस्थेच्या सेवांचा किंवा साधनांचा किमान मर्यादेत वापर करतो असा सदस्य, असा आहे.**

2.9 “ **संघीय संस्था** " म्हणजे ज्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेशी /संघीय सहकारी संस्थेशी संलग्न होईल ती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक अथवा संघीय सहकारी संस्था होय.

2.10“ **वित्तीय संस्था"** म्हणजे भारतीय रिझर्व बँक व नाबार्ड यांच्या मार्गदर्शक तत्त्वांच्या अधीन असलेली व भारतीय रिझर्व बँकेने विनियमित केलेल्या अशा वित्त संस्थेकडून कर्ज घेईल अशी संस्था .

2.11 " **राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण " याचा अर्थ, राज्य शासनाने कलम 73 गख अन्वये घटित केलेले प्राधिकरण, असा आहे.”**

2.12 "**मालजिनसा**" हयामध्ये मासे, जाळे, नांवा, बोटी, मत्स्यबीज, नायलॉन धागा, हापे, टिन, पॉलीथीन बँग, मत्स्यबीजासाठी लागणारी यंत्रसामुग्री, साहित्य, मत्स्य प्रक्रियेसाठी लागणारे साहित्य, यंत्रसामुग्री, मत्स्य खादय, माशापासून तयार झालेला माल इत्यादींचा समावेश आहे.

2.13 "**सर्वसाधारण सभा**" हयामध्ये वार्षिक सर्वसाधारण सभा व विशेष सर्वसाधारण सभांचा समावेश आहे.

2.14 "**चेअरमन"हयाचा** अर्थ हया पोटनियम क्र. 18.3 अन्वये अस्तित्वात आलेले चेअरमन.

2.15 "**कार्यकारी संचालक**" हयाचा अर्थ पोटनियम क्र. 20.2.15 अन्वये नियुक्त केलेले कार्यकारी संचालक .

2.16 "**सभासद**" हयाचा अर्थ पोटनियम क्र. 5 अन्वये समावेश केलेले सभासद.

2.17 "**कायदा**" हयाचा अर्थ महाराष्ट्र सहकारी संस्था नियम 1960.

2.18 "**नियम**" हयाचा अर्थ महाराष्ट्र सहकारी संस्था नियम 1961.

2.19 "**निबंधक** " हयाचा अर्थ महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 यात दिलेल्या व्याख्येनुसार निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य.

2.20 "**महासंघ**" हयाचा अर्थ महाराष्ट्र राज्य **सहकारी** मत्स्य व्यवसाय मर्यादित.

2.21 "**निमंत्रित प्रतिनिधी**" हयाचा अर्थ पोटनियम अन्वये संचालक मंडळाच्या सभेत निमंत्रित केलेले प्रतिनिधी.

## -: 3.0 उद्देश :-

3.1 मच्छिमारांच्या आर्थिक व सामाजिक उन्नतीसाठी तसेच मत्स्य व्यवसाय वाढीच्या दृष्टीने पूरक अशा योजना कार्यान्वित करुन माल जिनसाचे आधुनिक पध्दतीने उत्पादन, साठवणूक, प्रक्रिया करणे, विक्रीची व्यवस्था करणे. कार्यक्षेत्रातील मासळी व मासळी पक्रियेपासूनच्या उत्पादनास वर्षभरात किफायतशीर आणि खात्रीलायक बाजारपेठ मिळवून देण्याची व्यवस्था करणे तसेच संस्थांच्या सभासदांना या बाबतीत मार्गदर्शन करणे हे संघाचे उद्देश राहतील.

**3.2 वरील उद्देश पूर्तीसाठी संघाचे कार्य खालीलप्रमाणे राहील.**

3.2.1 सभासदांच्या हितास बाधा येणार नाही अशा रितीने सभासद व इतरांकडून मालजिनसा खरेदी करणे, एकत्रित करणे, पदार्थ तयार करणे व त्यांची विक्री आणि वितरण व्यवस्था करणे.

3.2.2 स्वत: ची किंवा भाडेपट्टीने किंवा इतर मार्गाने स्थावर व जंगम मालमत्ता धारण करणे आणि  त्याची विल्हेवाट लावणे.

3.2.3 इमारती, यंत्रसामुग्री, प्रकल्प (प्लॅन्टस) आणि/किंवा सहाय्यभूत उपकरणे खरेदी करणे आणि किंवा उभारणे.

3.2.4 नवीन प्राथमिक सहकारी मच्छिमार संस्था संघटित करणे, कार्यक्षेत्रातील संस्थांच्या कामकाजात  सुधारणा घडवून आणण्याच्या दृष्टीने संघ त्यांना सल्ला, मार्गदर्शन व मदत करेल. त्यांच्या कामकाजातील दोष सुधारण्याच्या दृष्टीने नियंत्रण ठेवील. संघाची संस्थेवर प्रशासक म्हणून   नेमणूक झाल्यास संघ अशा संस्थेचे व्यवस्थापन ताब्यात घेईल.

**3.3** जिल्हयात ज्या मत्स्य पालन व मच्छिमारीचा धंदा करीत असतील त्या सर्वांमध्ये सहकार्य, स्वावलंबन  व परस्पर सहाय्याची भावना निर्माण करणे.

**3.4** या संघाच्या कार्यक्षेत्रातील संघाशी संलग्न असलेल्या मत्स्य पालन संस्थांच्या मासळीची   किफायतीशीर विक्री करण्याची व्यवस्था करणे.

**3.5** मच्छिमार बोटी/नौका व डोंगे बांधणे तसेच त्याची दुरुस्ती करणे, मच्छिमारीसाठी लागणारी जाळी, उपकरणे तयार करणे इत्यादि कामकाजासाठी लागणारे बहुउद्देशिय कारखाने स्थापन करुन ते  चालविणे.

**3.6** मत्स्य पालन संस्थेच्या सभासदांना लागणारे नायलॉन सुत व दोर, पेन व तर माल तयार करणे, खरेदी करणे व विकणे.

3.7 बर्फाचे कारखाने, शितगृहे रेफ्रिजेरटरर्स, मोटारगाडया तसेच मासळी टिकविण्याच्या कामी उपयोगी पडणारी नविन सुधारलेली साधने (शितपेटया ) विकत घेणे अथवा भाडयाने घेणे.

3.8 मासळी पासुन बनविलेल्या वस्तु मच्छिमार लोकांना लागणाऱ्या इतर वस्तु यांचा साठा करुन ठेवण्यासाठी लागणाऱ्या वखारी बांधणे, विकत घेणे किंवा भाडयाने घेणे.

3.9 मासळी उत्पादन व वाटपाचे क्षेत्र वाढावे या हेतूने सुधारलेल्या पध्दतीच्या बोटी मासेमारी ची उपकरणे तसेच नॉयलॉन जाळी, लॉरीस, ट्रक्स, टेम्पो यासारखी तांत्रिक साधणे विकत घेणे किंवा भाडयाने घेणे, देणे तसेच जरुरी भासल्यास उपरोक्त उपकरणे व साधणे व साधण यांची व्यवस्था राखण्याची कामगिरी संलग्न संस्थाकडून आपल्याकडे घेणे.

3.10 संघाचे सभासद असलेल्या संस्थची किंवा इतरांची मासळीची खरेदी विक्री करणे, मासळीची प्रक्रीया करणे व तिच्या वाहतूकीची व्यवस्था करणे.

3.11 मासळी पकडण्याच्या, मासळी टिकविण्याच्या, मच्छ संवर्धनाच्या मासळीपासुन तयार होणाऱ्या निरनिराळया वस्तुच्या सुधारलेल्या पध्दती अंमलात आणण्यासाठी प्रचार करीत राहणे.

3.12 नविन प्राथमिक मत्स्य पालन सहकारी संस्था संघटीत करणे, कार्यक्षेत्रातील संस्थाच्या कामकाजात सुधारणा घडवून आणण्याच्या दृष्टीने संघाने त्यांना सल्ला देणे व मार्गदर्शन मदत करणे, प्राथमिक मत्स्य पालन सहकारी संस्थाच्या कामकाजातील दोष सुधारण्याच्या दृष्टीने आवश्यक मार्गदर्शन करणे.

3.13 आवश्यकतेनुसार संघाच्या स्थावर व जंगम मालमत्तेचाविमा उतरविणे, संलग्न संस्थाच्या सभासदांचा विमा उतरविणे

3.14 सभासदामध्ये सहकार्याची भावना वृध्दीगत करुन तिचा व्यवस्थापनात उपयोग करणे.

3.15 संलग्न संस्थानी विक्रीची व्यवस्था करणे.

3.16 मत्स्य व्यवसायाशी संबंधीत संशोधन व विकास प्रतिष्ठानाची स्वतंत्र स्थापना करणे निधी उभारणे व निधीस सहाय्य करणे.

3.17 संघाचे व्यवस्थापनेसाठी जिल्हयात एक अगर अनेक शाखा कार्यालये उघडणे.

3.18 मच्छिमार सहकारी संस्थाना तांत्रिक आर्थिक प्रशासकीय व तत्सम सहाय्य करणे.

3.19 संघाकडे विक्रीकरीता पाठविण्यात येणारी मासळी व अशा मासळीपासून बनविलेल्या वस्तु यांच्या तारणावर आगाऊ रक्कम देणे.

3.20 संघाचे सभासद असलेल्या सहकारी संस्थाना बाजारपेठे बाबतचा तपशिल पुरविण्याची व्यवस्था करणे.

3.21 मच्छिमारांची आर्थिक परिस्थिती सुधारण्या करीता मच्छिमार सहकारी संस्था व मच्छिमार हया विषयी आस्था बाळगणारे लोक यांच्या परीषद भरविण्याची व्यवस्था करणे.

3.22 सर्वसाधारण सभेच्या परवानगीने इमारती व जमीनी विकत घेणे किंवा भाडयाने घेणे.

3.23 संघाचे व्यवस्थापन चालविणे करीता आर्थिक उत्पन्नाचे साधन जसे मत्स्यबीज निर्मिती मत्स्योत्पादन इत्यादी करीता जलाशय ठेके घेणे, मत्स्यबीज केंद्र निर्माण करणे, ठेक्याणे घेणे इत्यादी .

3.24 वर नमुद केल्या पैकी एखादया किंवा सर्व उद्‌देश साध्य करण्याच्या कामी पुरक अथवा उपकारक ठरणारी कामगिरी हाती घेणे.

3.25 संघाकरीता कायमस्वरुपी वैयक्तीक किंवा शासकीय जमीन खरेदी घेणे दिर्घ मुदतीवर संघास लिजवर जमिन घेणे तसेच संघास दानपत्र म्हणून जमिन घेणे.

3.26 संघाकरिता बर्फ कारखाना व शितगृहाची कायमस्वरुपी निर्मीती करणे बांधणे वा भाडयाने घेणे देणे.

3.27 संघा करिता संघास स्वयचलीत बोटी निर्माण करणे तसेच नौकाची निर्मीती करणे व गरज भासल्यास प्राथमिक मत्स्यमार संस्थास मासेमारीच्या उपयोगासाठी विकत देणे किंवा शासकीय योजने मार्फत नियमानुसार अनुदानावर देणे किंवा भाडयाने देणे.

3.28 संघावर कायमस्वरुपी ऑफिस निर्मीती करणे अगर भाडयाने घेणे देणे.

3.29 संघामार्फत मासोळी विक्री क्रेन्द्र प्रत्येक तालुका मुख्यालयी उघडणे चालविणे गरज भासल्यास गांव पातळीवर मासळी विक्री केंद्र उघडणे चालविणे.

3.30 सभासदांच्या समान हितसंबंध असलेल्या अडीअडचणी सोडविणे.

3.31 सहकारी तत्त्वाचे प्रसारण करणे व सभासदामध्ये सहकाराची भावना वृध्दींगत करुन तिचा व्यवस्थापनेत उपयोग करणे.

3.32 संघाच्या उद्देश पूर्तीसाठी सभासद व कर्मचारी यांना प्रशिक्षण देण्याची व्यवस्था करणे.

3.33 सभासद कर्मचा-यांच्या हितासाठी विश्वस्त निधी उभा करणे व अशा निधीस साहाय्य करणे.

3.34 मत्स्य व्यवसायाशी संबंधित संशोधन व विकास प्रतिष्ठानाची स्वतंत्र स्थापना करुन निधी उभारणे व निधीस सहाय्य करणे.

3.35 बचत योजना आखून त्या कार्यान्वित करण्यास प्रोत्साहन देणे.

3.36 मालजिनसांच्या वाहतुकीची व्यवस्था करणे.

3.37 मत्स्य संवर्धनासाठी संलग्न संस्थांना व मच्छिमारांना अल्प व मध्यम मुदतीचे कर्ज उपलब्ध करुन देण्यास मदत करणे.

3.38 संघाच्या व संघात असलेल्या या संस्थांच्या गरजा भागविण्याकरिता पोटनियम क्र. 4 मध्ये नमूद केलेल्या साधनांनी (मार्गानी) भांडवल जमविणे, अर्थसहाय्य करणा-या कोणत्याही संस्थेकडून संघाच्या उद्देशपूर्तीसाठी कर्ज व अनुदानाच्या रुपाने आर्थिक मदत स्वीकारणे.

3.39 सहकारी मच्छिमार संस्थांना आवश्यक ते तांत्रिक, आर्थिक, प्रशासकीय व तत्सम साहाय्य करणे.

3.40 वरील उद्देशांना धरुन व त्यांचे पूर्ततेसाठी सर्वसाधारणपणे आवश्यक अशी सर्व कामे करणे.

**टिप:** मासळी व मासळीजन्य पदार्थाव्यतिरिक्त संघाने इतर माल जिनसांचे उत्पादन, प्रक्रिया व विक्री करण्याचे ठरविल्यास उपनिबंधक सहकारी संस्था यांची पूर्व परवानगी घ्यावी लागेल.

---------------------------------------------------------------------------------------

## 4.0 **निधी:**

4.1 निधी खालील मार्गाने उभारण्यात येतील.

4.1.1 प्रवेश फी

4.1.2 भाग (शेअर्स)

4.1.3 सभासद व बिगर सभासदांकडून ठेवी स्वीकारणे.

4.1.4 कर्जे

4.1.5 अनुदान मदत व सवलतीद्वारे.

4.1.6 शेअर वर्गणी

4.2 संघाची स्थावर व जंगम मालमत्ता तारण ठेऊन संघाचे उद्देश पूर्तीसाठी कर्ज उभारता येईल.

4.3 संघाचे अधिकृत भाग भांडवल वीस कोटी रुपये राहील. एकूण वीस लाख समान भाग प्रत्येकी शंभर रुपये दर्शनी किंमतीचे विक्रीस काढले जातील. भाग विकत घेताना दर्शनी किंमती भागाच्या प्रमाणात पूर्णत: भरावी लागेल. सभासदाची जबाबदारी त्यांनी धारण केलेल्या भागाच्या किंमतीएवढी मर्यादित राहील.

4.4 पोटनियम क्र. 4.1.3,4.1.4,4.1.5 मध्ये उल्लेख केलेल्या मार्गांनी जमविलेली एकुण रक्कम, वसूल झालेले भाग भांडवल, साठवलेली गंगाजळी व इमारत फंड यातून साचलेला तोटा वजा जाता राहिलेल्या रक्कमेच्या 10 पटीहून जास्त, निबंधकाच्या पूर्व परवानगीशिवांय असणार नाही.

4.5 संघाच्या निधीची अथवा ठेवीची गुंतवणूक सहकारी कायदा कलम 70 अन्वये करण्यात येईल.

## 5.0 **सभासदत्व :**

5.0 कार्यक्षेत्रातील नोंदणी झालेल्या प्राथमिक सहकारी मच्छिमार संस्था संघाच्या सभासद धारण करतील त्या सभासदाचे प्रकार खालील प्रमाणे.

**अ)** क्रियाशिल सभासद **ब)** अक्रियाशिल सभासद क) सहयोगी, नाममात्र सभासद

**5.1 (अ) क्रियाशिल सभासद:- क्रियाशिल सभासद म्हणजे संघाच्या व्यवस्थापनात त्याचा थेट सहभाग आहे. क्रियाशिल सभासदांना सलग पाच वर्षात किमान एकदा संघ पुरवित असलेल्या सेवाचा किमान लाभ घेणे**

**अथवा संस्थेला सेवा पुरविणे आवश्यक आहे आणि पाच वर्षात किमान एक वार्षिक सर्वसाधारण सभेस हजर असणे आवश्यक आहे.**

**केवळ क्रियाशिल सभासदालाच निवडणूकीत मतदानाचा अधिकार राहील. त्याच प्रमाणे क्रियाशिल सभासदाच्या नोंद वही प्रतिवर्षी तयार करुन त्यास प्रसिध्दी देणे आवश्यक राहील. जो सभासद वरिल अटीची पूर्तता करित नसेल अशा सभासदांचे वर्गीकरण अक्रियाशिल सभासद म्हणून करण्यात येईल.**

5.1(ब) **अक्रियाशिल सभासद:- परंतु जो सदस्य वरीलप्रमाणे लागोपाठ पाच वर्षाच्या कालावधीत अधिमंडळाच्या किमान एका बैठकीला उपस्थित राहणार नाही आणि लागोपाठच्या पाच वर्षाच्या कालावधीत किमान एकदा सेवांचा किमान मर्यादेत वापर करणार नाही, अशा कोणत्याही सदस्याचे अक्रियाशील सदस्य म्हणून वर्गीकरण करण्यात येईल.**

1. **परंतु आणखी असे की, जेव्हा संस्था एखाद्या सदस्याचे अक्रियाशील सदस्य म्हणून वर्गीकरण करील तेव्हा, ती संस्था, वित्तीय वर्ष समाप्त होण्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत, संबंधित सदस्याला अशा वर्गीकरणाबाबत विहित रीतीने कळवील.**

2. **परंतु असेही की, जो अक्रियाशील सदस्य असे त्याचे वर्गीकरण केल्याच्या दिनांकापासून पुढील पाच वर्षामध्ये किमान मत्स्य पुरवठा करणार नाही व सर्व सदस्य मंडळाच्या निदान एका बैठकीला उपस्थित राहणार नाही आणि उपविधीमध्ये विनिर्दिष्टे केल्याप्रमाणे सेवांचा किमान मर्यादेत वापर**

**करणार नाही असा कोणताही अक्रियाशील सदस्य कलम 35 अन्वये त्याला काढून टाकले जाण्यास पात्र ठरेल.**

3. **परंतु असेही की, अक्रियाशील सदस्य म्हणून वर्गीकरण केलेल्या सदस्याने, या पोट-कलमाच्या खंड (क) व (ख) मध्ये तरतुद केल्याप्रमाणे पात्रता निकषांची पूर्तता केल्यावर, तो क्रियाशील सदस्य म्हणून त्याने पुन:वर्गीकरण केले जाण्यास हक्कदार होईल.**
4. **परंतु असेही की, एखादा सदस्य क्रियाशील किंवा अक्रियाशील सदस्य असण्याबाबत वाद उदभवल्यास, असे वर्गीकरण केल्याचे कळविल्याच्या दिनांकापासून साठ दिवसांच्या कालावधीच्या आत निबंधकाकडे त्याबाबत अपील करण्यात येईल.**
5. **परंतु असे ही की, महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) अध्यादेश, 2013 याच्या प्रारंभाच्या लगतनंतर घेण्यात येणा-या कोणत्याही निवडणुकीत, त्या संस्थेचे सर्व विद्यमान सदस्य, त्यांना मतदान करण्यासाठी अन्यथा अपात्र घोषित केले नसेल तर, मतदान करण्यासाठी पात्र ठरतील.**

5.1(**क**) “नाममात्र सदस्य ” अगर “ सहयोगी सभासद ” म्हणून एखाद्या व्यक्तीस त्याचे लेखी अर्जावरुन अधिनियम कलम क्रमांक 24 मधील तरतुदीनुसार सदस्य करुन घेता येईल, मात्र त्याने उपविधी क्रमांक 5 मधील क्रमांक 1,2,3,5,8,9,11 , 12,13,14 व 16 मधील अटी पु-या केल्या असल्या पाहिजेत. अशा सदस्यांचे संस्थेशी होणारे व्यवहार व संस्थेतील त्याचे अधिकार अधिनियम कलमे अनुक्रमे

क्रमांक 24 27(8) मधील तरतुदींना अनुसरुन मर्यादित स्वरुपाचे असतील, त्याहून जास्त असणार नाहीत. “ सहयोगी ” सदस्यांना नियम क्रमांक 20 मधील तरतुदीनुसार. सदस्य करुन घेता येईल.

5.1.2 राज्य सरकार

5.1.3 संघाशी व्यवहार करणारे विक्रेते, त्यांची हमी देणारे आणि संघाचा ज्यांच्याशी आर्थिक संबंध येत आहे अशा संस्था व व्यक्ती. नाममात्र सभासदांना भाग धारण करावे लागणार नाही. परंतु ज्यांचा व्यवहार एक लाखा प्रयन्त आहे त्यांना प्रत्येकी फी **रु. 251, व्यवहार एक लाख ते पाच लाख रुपये** 500, **व्यवहार पाच लाख ते दहा लाख रु.**750, **व्यवहार दहा लाखावर रुपये** 1000/- भरावे लागेल. त्यांना मत देण्याचे व संघाच्या व्यवस्थापनात भाग घेण्याचे व संघाच्या नफयात हिस्सा घेण्याचे अधिकार राहणार नाहीत. अशा सभासदाचे नाममात्र सभासदत्व त्यांचा संघाशी आर्थिक संबंध असेपर्यंत राहील. तसेच संघ अवसायानात घेण्यात आला तर नाममात्र सभासदावर कसल्याही प्रकारे दायित्व राहणार नाही.

5.1.4. संघाचे सभासदत्वासाठी अर्ज केलेल्या नियोजित संस्था तसेच सभासद नसलेल्या प्राथमिक सहकारी मत्स्य संस्थांना तीन महिन्याच्या मुदतीसाठी नाममात्र सभासद करुन घेतले जाईल.

## 5.2 **सभासद होण्यासाठी खालील अटी पूर्ण कराव्या लागतील.**

5.2.1 प्रवेश फी **रु.** 501/- दिली पाहिजे.

5.2.2 किमान **दहा भाग** धारण केले पाहिजेत.

5.2.3 सभासद होण्यापूर्वी संस्थेने संघास तीन महिन्यापर्यंत प्रतिदिन पहिल्या किमान 50 (पन्नास) किलो मासळी पुरवठा केला पाहिजे.

5.2.4 संघाने तयार केलेल्या नमुन्यात करारनामा करुन दिला पाहिजे.

5.3 संघाचे नोंदणीचे वेळी प्रवर्तक म्हणून नोंदणी प्रकरणावर सहया करणा-या सहकारी मत्स्य व्यवसाय संस्थांना संघाचे सामान्य सभासदत्व आपोआप प्राप्त झाले आहे असे गृहित धरण्यात येईल.

5.4 पोटनियम क्र. 5.4 मध्ये नमूद केलेल्या संस्था वगळून इतर प्राथमिक मत्स्य व्यवसाय संस्थांनी संघाच्या सामान्य सभासदत्वासाठी रु. 501/- प्रवेश फी व आवश्यक असलेल्या भागांच्या रक्कमेसहित लेखी अर्ज केला पाहिजे.

5.5 संघाचे संचालक मंडळ वेळोवेळी ठरविल त्या प्रमाणात भाग भांडवल आणि/किंवा ऋणपत्रे सामान्य सभासदांकडून त्यांनी संघाशी केलेल्या व्यवहाराचे प्रमाणात उभारण्याचा अधिकार संघास राहील.

5.6 भाग भांडवल आणि/किंवा ऋणपत्रे 6 महिन्याचे वर भरण्याचे राहिल्यास अशा सभासदाविरुध्द संचालक मंडळास योग्य ती कारवाई करता येईल.

5.7 एकाच तारखेस विकत घेतलेल्या प्रत्येक भागांबद्दल निराळा क्रमांक असलेले भाग प्रमाणपत्र दिले जाईल. अथवा एकापेक्षा जास्त भाग घेतले असल्यास त्या

सर्व भागांबद्दल निरनिराळे क्रमांक देऊन भागाचे एकत्रित एकच प्रमाणपत्र दिले जाईल.

**5.8** सभासदांकडून गहाळ झालेल्या एक किंवा अनेक भाग प्रमाणपत्राकरिता दुसरी प्रत (डुप्लिकेट) भाग प्रमाणपत्र दिले जाईल. मात्र याकरिता संचालक मंडळाची मंजूरी हवी व प्रत्येक भाग प्रमाणपत्राकरिता 10 रुपये फी सभासदाने द्यावयास हवी. सभासदाला पुरावा म्हणून इन्डीमिनीटी बॉन्ड द्यावा लागेल व नवीन भाग प्रमाणपत्रात तसे लिहिले जाईल.

**5.9** नोंदणी झालेली प्राथमिक मत्स्य व्यवसाय संस्था संघाची सभासद झाल्यापासून सहा महिन्याच्या आत नमुना पोटनियम तिने स्वीकारले पाहिजेत.

## 6 . दायित्व:

**6.1** सामान्य सभासदाचे दायित्व त्याने धारण केलेल्या भागाच्या किंमतीपेक्षा अधिक असणार नाही.

**6.2** सभासद संस्था संघाच्या संचालक मंडळाच्या शिफारशीशिवाय आणि निबंधकाच्या पूर्व परवानगीशिवाय संघाशी असलेली संलग्नता रद्द करु शकणार नाही.

## 7.सभासदत्व कमी करणे.

सामान्य सभासदास सहकारी कायद्यातील तरतुदीस अनुसरुन, सर्वसाधारण सभेस हजर असलेल्या आणि मतदान करणा-या सभासदांच्या 3/4 बहुमताने खालील कारणास्तव काढून टाकण्यात येईल.

7.1 तिने वर्षातून किमान 180 दिवस संघाला मासळीचा पुरवठा केला नाही तर.

7.2 तिने संघाची बाकी दीर्घकाळ थकविली असेल अथवा कर्तव्यात सतत कुचराई केली असेल तर.

7.3 ती जाणूनबुजून खोटी विधाने करुन संघाला फसवित असेल तर.

7.4 ती संघाच्या इभ्रतीस नुकसान पोहोचविणारे कृत्य करीत असेल तर.

7.5 ती मासळीत भेसळ करुन संघाला फसवित असेत तर.

7.6 ती संघाचे शासनाचे आदेशाप्रमाणे कामकाज करीत नसेल तर.

7.7 स्थानिक किरकोळ विक्री वगळून आणि संघाच्या पूर्व परवानगिशिवाय संघाव्यतिरिक्त मासळी विक्री करीत असेल तर (स्थानिक विक्री फक्त किरकोळ ग्राहकांना कार्यक्षेत्रातच करता येईल.)

7.8 संचालक मंडळ अशा सभासदांना काढून टाकण्यापूर्वी तशी चौदा दिवसाची सूचना (नोटीस) देईल व त्यांचे म्हणणे ऐकून घेईल. अशा रितीने सभासदत्व रद्द झालेल्या सभासदाचे सर्व भाग (शेअर्स) जप्त अगर परत करता येतील.

**7.9 महाराष्ट्र सहकारी कायदा, कलम 35 अन्वये आणि पोटनियम 10 अन्वये रद्द झालेले सभासद सर्वसाधारण सभेच्या ठरावाने नवीन म्हणून दाखल होऊ शकतील. परंतु नवीन सभासद होतेवेळी त्यांनी पूर्वी धारण केलेल्या भागाइतके नवीन भाग घेणे आवश्यक राहील.**

## 8.भाग हस्तांतर:

8.1 एखादा सामान्य सभासद आपले भाग किमान एक वर्ष धारण केल्यानंतर व संचालक मंडळाच्या मंजुरीने दुस-या समन्वय सभासदाचे नावे हस्तांतर करु शकेल.

8.2 तथापि असे हस्तांतर भाग हस्तांतर रजिस्टरमध्ये नोंदविल्याखेरीज व प्रत्येक भागांमध्ये 100 रुपये हस्तांतर शुल्क दिल्याखेरीज पूर्ण होणार नाही.

8.3 भाग हस्तांतर महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम कलम 29 व 30 आणि नियम क्रमांक 24 व 25 मधील तरतुदीस अनुसरुन राहील.

**8.4 संस्थेचे भाग हस्तातंरण करताना पुढील प्रमाणे हस्तांतरीत केले जातील.**

8.4.1 प्रत्येक सभासदांची येणे बाकीच्या 2 टक्के भाग धारण असल्यास पुन्हा शेअर्स कपात केली जाणार नाही.

8.4.2 सभासदांचे भाग वारसा हक्काने हस्तातंरीत करताना दर्शनी मूल्यांनी हस्तातंरीत केले जातील.

8.4.3 सभासदाचे भाग संस्थेच्या इतर सभासदांना हस्तातंरीत करताना दर्शनी मुल्यांनी हस्तांतरीत केले जातील.

8.4.4 सभासदांचे भाग संस्थेच्या नवीन सभासदांना हस्तांतरीत करताना त्या वर्षाच्या ताळेबंदाप्रमाणे नक्त मूल्य काढून हस्तांतरीत केले जातील.

8.4.5 सभासदांचे भाग त्यांच्या कर्जामध्ये हस्तांतरीत करताना त्या वर्षाच्या ताळेबंदाप्रमाणे नक्त मुल्य काढून हस्तांतरीत केले जातील.

8.4.6 सभासदांचे भाग अल्पांशाने संस्थेस परत करताना त्या वर्षाच्या ताळेबंदाप्रमाणे नक्त मुल्य काढून हस्तांतरीत केले जातील.

सभासदांचे भाग राजीनामा दिल्यानंतर पूर्णपणे संस्थेस परत करताना त्या वर्षाच्या ताळेबंदाप्रमाणे नक्त मूल्य काढून हस्तांतरीत केले जातील. संस्थेचे भाग सभासदास पूर्णपणे परत दिल्यानंतर अशा सभासदास कोणत्याही परिस्थितीत तीन वर्षापर्यंत संस्थेचे पुन:श्च सभासद करुन घेणेत येणार नाही. परंतु राजीनामा देताना धारण केलेल्या भागाएवढे भागा एवढे भाग घेवून त्यास कोणत्याही वेळी पुन्हा सदस्यत्व प्राप्त करता येईल.

## 9. सभासदत्व रद्द होणे:

9.1 सभासदांचे सदस्यत्व खालील कारणास्तव रद्द होऊ शकेल.

9.2राजीनामा दिल्यास.

9.3 आवसायनात (लिक्विडेशन) काढल्यानंतर

9.4पोटनियम क्र.7 मधील तरतुदीन्वये काढून टाकल्यानंतर.

## 10.भाग परतफेड:

10.1 राज्य सरकारचे भाग भांडवल मिळाले असल्यास ते राज्य सरकारने ठरविलेल्या मुदतीत आणि पध्दतीने फेडले जाईल.

10.2 राज्य शासनाने भाग भांडवल धारण केलेल्या तारखेपासून भाग 15 वर्षापर्यंत उपनिबंधक, सहकारी संस्था (मत्स्य) महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या पूर्व अनुमतीशिवाय सभासदांना परत करता येणार नाही.

10.3 एखाद्या सामान्य सभासदाने धारण केलेले भाग भांडवल राज्य सरकारच्या पूर्व परवानगीशिवाय एकूण वसूल भाग भांडवलाच्या एक पंचमांश किंवा वीस हजार रुपये यापैकी जी रक्कम कमी असेल त्यापेक्षा अधिक असणार नाही.

10.4 पोटनियम क्र. 7 व 10 मधील तरतुदीनुसार कमी झालेल्या सभासदांचे भाग भांडवल जप्त केले नसल्यास, सभासदत्व कमी झाल्यापासून पोटनियम क्र. 11.2 मधील तरतुदीस पात्र राहून एक वर्षाचे कालावधीत परत केले जाईल.

10.4.1 तथापि कोणत्याही सहकारी वर्षात परत करावयाचे भाग भांडवल हे लगतच्या 31 मार्च रोजी असलेल्या संघाच्या एकूण भागभांडवलाचे 10 % पेक्षा अधिक असणार नाही.

10.4.2 संघाने जर एखाद्या सहकारी अथवा इतर संस्थेकडून कर्ज काढले असल्यास त्यांच्या पूर्व संमतीशिवाय कोणतीही भाग रक्कम परत केली जाणार नाही.

10.4.3 भागाची रक्कम परत करताना भागाची किंमत महाराष्ट्र सहकारी संस्था नियम 1961 क्रमांक 23 मधील तरतुदीनुसार ठरविली जाईल.

## 11. **सामान्य सभासदांची कर्तव्ये.**

11.1 सभासद संस्थेने व तिच्या उत्पादक सभासदांनी उत्पादन केलेले मासळी स्थानिक किरकोळ विक्री वगळून संघास पुरविले पाहिजे.

11.2 संचालक मंडळ ठरविल त्या प्रमाणात सभासद, भाग व/ किंवा ऋणपत्रे मालजिनसांच्या किंमतीच्या प्रमाणात खरेदी करतील. अशी खरेदी मागील वर्षी पुरवठा केलेल्या मालजिनसांच्या 20 % किंमतीपेक्षा अधिक राहणार नाही.

11.3 मालजिनसांचा पुरवठा, ठरवून दिलेले स्थळ, वेळ व वाहतुक व्यवस्था याबाबतच्या संघाच्या सूचना अंमलात आणल्या पाहिजेत.

11.4 मासळी अथवा इतर कोणत्याही माल जिनसा भेसळ न करता संकलन केल्या पाहिजेत.

11.5 संघाने वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे पालन केले पाहिजे. संघाचे उद्देशपूर्तीसाठी लागणारी आवश्यक ती सर्व माहिती संघास पुरविली पाहिजे.

11.6 सभासदांनी वरील व यासारखी कर्तव्ये बजावणीत कसूर केल्यास परिणामी संघास होणा-या नुकसानीची जबाबदारी संघाचे संचालक मंडळ ठरविल त्या प्रमाणात बसविण्यात येईल.

## 12.अधिमंडळाची वार्षीक बैठक

सर्वसाधारण सभेत खालील व्यक्ती/प्रतिनिधींचा समावेश राहील.

12.1संलग्न संस्थांचे अधिकृत प्रतिनिधी.

12.2संचालक मंडळ सदस्य.

12.3 सर्वसाधारण सभेकरिता चेअरमन हे अध्यक्ष राहतील. त्यांचे गैरहजेरीत हजर सभासदांनी संचालक मंडळातील निवडून दिलेला सदस्य अध्यक्ष म्हणून सभेचे कामकाज चालविल.

12.4 संस्थेच्या सदस्यांच्या सर्व साधारण सभेकडे संस्थेची अखेरची सत्ता राहील. पण ती सत्ता अधिनियम, नियम व उपविधी यातील तरतुदींना अधीन राहील.

12.5 संस्थेची पहिली सर्व साधारण सभा नियम क्रमांक 59 मधील तरतुदीनुसार भरविली जाईल व तिच्यात त्याच तरतुदीनुसार कामे केली जातील. पहिल्या सभेव्यतिरिक्त संस्थेच्या इतर सर्वसाधरण सभा नियम 60 मधील तरतुदी नुसार नोंदणी अधिका-याला सूचना देवून आवश्यकते नुसार भरविल्या जातील व त्याच तरतुदीनुसार सदर सभांचे कामकाज करण्यात येईल. परंतु प्रत्येक वर्षी 31 मार्च नंतर 30 सप्टेंबरच्या आंत अधिनियम कलम 75 व नियम 60 मधील तरतुदी नुसार अधिमंडळाची वार्षीक बैठक बोलविणे बंधनकारक राहील. मुदतीत सभा घेण्याची जबाबदारी संस्थेचे अध्यक्ष व मुख्यकार्यकारी अधिकारी/कार्यकारी संचालक/ संचालक/ व्यवस्थापक / व्यवस्थापकीय संचालक/सचिव यांची राहील.

(अ) नियम 61 अन्वये विहित नमुन्यात तयार केलेले लेख्याचे वार्षीक विवरण पत्रापैकी नफा-तोटा पत्रक व ताळेबंद यांची प्रत समितीच्या वार्षीक प्रतिवृत्ताची प्रत आणि मागील सहकार वर्षाच्या लेखा परिक्षण ज्ञापनाचा सारांशाची प्रत वार्षिक सर्वसाधारण संभेच्या तारखेपूर्वी चौदा 14 दिवस अगोदर त्या वर्षाच्या आर्थिक पत्रके असणारा संस्थेच्या कामकाजाचा अहवाल सभासदांना पाठविला जाईल व नंतर ते सर्वसाधारण सभेच्या मंजूरी करिता ठेवले जातील.

**(ब) सर्वसाधारण सभेने करावयाच्या कामात पुढील कामाचा समावेश होतो.**

**1. खालील कामे वार्षिक सर्वसाधारण सभेतच केली जातील-**

**अ. तक्रार निवारण समितीची नियुक्ती करणे**

**ब. संस्थेच्या मागील लगतच्या वर्षाचा लेखापरीक्षण अहवाल वाचन करणे.**

**क. लेखापरीक्षण करण्यात आलेले जमा-खर्चाचे लेखे,नफा तोटा पत्रक व ताळेबंद यामध्ये आवश्यकतेनुसार सुधारणा करुन मंजूरी देणे.**

**ड. संचालक मंडळाने शिफारस केलेल्या नफा वाटणीस लेखापरीक्षणतील अभिप्रायाच्या अधिनतेने मंजूरी देणे.**

**इ. मागील लगतपूर्व लेखापरीक्षण अहवालाचा दोषदुरुस्ती अहवाल सादर करणे.**

**ई. संचालक मंडळाने शिफारस केलेल्या पुढील वर्षाच्या अंदाज पत्रकांस मंजूरी देणे.**

**उ. सदस्यांचे हकालपट्टीबाबत सभेपुढे आलेल्या विषयांचा निर्णय घेणे.**

**ऊ . पुढील आर्थिक वर्षायाठी शासनाने/निबंधकाने मान्य व प्रसिध्द केलेल्या लेखापरीक्षकांच्या नामतालिकेमधील लेखापरीक्षकाची नियुक्ती करणे. दरवर्षी आर्थिक वर्ष संपल्यानंतर सहा महिन्याच्या आंत लेखापरीक्षण करुन घेणे.**

**2. मागिल सभेत झालेल्या कार्यवृत्तांताचा,कार्यवाहीचा आढावा.**

**3. लेखापरिक्षण अहवालाचा दोषदुरूस्ती अहवाल सादर करणे, विहित मुदतीत दोषदुरुस्ती अहवाल सादर न केल्यास कलम 82 नुसार शास्ती लागू होतील.**

4. कलम 75 मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी जर संस्थेच्या सर्वसाधारण सभेने एखादया बाबीवरील खर्च नामंजूर केल्यास  सदर मुद्यांसंबधी चौकशी करण्यासाठी निबंधकास कळविणे

5. उपविधी क्रमांक 4 मधील मर्यादेस अधीन राहून पुढील वर्षाकरिता उभारावयाच्या बाहेरील कर्जाची मर्यादा ठरविणे.

6.  सहकार खात्याकडून व केंद्रीय सहकारी बँकेकडून आलेला पत्रव्यवहार यांचा विचार करणे.

7. उपविधी क्रमांक 7 प्रमाणे सदस्यांना संस्थेकडून काढून टाकण्याच्या कामी करावयाच्या उपाययोजनेचा विचार करणे.

8. नवीन उपविधी स्वीकारणे, अंमलात असलेल्या उपविधीत बदल करणे किंवा काही उपविधी वगळणे.

9.लगतपूर्व वर्षात कोणत्याही समिती सभासदास व त्याच्या कु टूंबास (म्हणजे पती, पत्नी आई, वडील,भाऊ , बहीण, मुलगा,मुलगी, जावई व किंवा सुन यांना) संचालक, सभासद अगर भागीदार असलेल्या संस्था, भागीदार पेढया किंवा कंपन्या यांना दिलेल्या कर्जाचा, त्याच्या परतफेडीचा व चालू वर्षअखेर येणे राहिलेल्या कर्जाचा तपशील देणारी माहितीपत्रके संस्थेच्या वार्षिक सभेपुढे ठेवली पाहिजेत.

10. लेखापरिक्षकांची नियुक्ती रद्य करणे व त्या अनुषंगाने पुर्ननियुक्ती करणे.

11. इतर कोणत्याही संस्थेशी भागीदारी करार करणेबाबत निर्णय घेणे.

12. मत्ता व दायित्वे, एकत्रिकरण,विभाजन,हस्तांतरण याबाबतचा निर्णय घेणे.

13. निबंधकाने दाखल केलेल्या चौकशी अहवालावर कार्यवाही करणे.

14. बुडीत कर्जाबाबत निर्णय घेणे.

15. संघीय संस्थेशी संलग्न होणेबाबतचे निर्णय घेणे परंतु असा ठराव संस्थेच्या एकूण सदस्यांच्या 3/4(तीन चतुर्थांश) बहुमताने मंजूर होणे आवश्यक आहे.

16. संघाच्या निरनिराळया व्यवहारांसाठी विभागवार उपसमित्या नेमणे.

17. अधिनियम कलम 76 मधील तरतूदीनुसार संस्थेला विशेष साधारण सभा बोलविता येईल व त्याच तरतुदीनुसार ती बोलविलीच पाहिजे खालील परिस्थितीत ती एक महिन्यात बोलविलीच पाहिजे

अ) संस्थेच्या एकूण सदस्यांच्या एक पंचमांश सदस्यांनी लेखी मागणी केल्यास

ब) नोंदणी अधिकारी यांनी सूचना केल्यास

क) एखादी संस्था संघीय संस्थेची सभासद असल्यास अशा संघीय संस्थेने मागणी केल्यास

18.सर्वसाधारण सभांची कार्यरित अधिनियम कलम क्रमांक 60 मधील तरतूदीनुसार असेल.

19. अधिमंडळाची वार्षिक बैठकची 14 दिवसांची विशेष साधारण सभेची सात दिवसांची लेखी नोटीस व कार्यक्रम पत्रिका अशा सभेपूर्वी काढून संस्थेच्या सचिवाने ती सभा बोलविली पाहिजे अशा सभेच्या सूचना नोंदणी अधिकारी यांना दिली पाहिजे. सभेची नोटीस व कार्यक्रमपत्रिका संस्थेच्या कचेरीच्या नोटीस बोर्डावर व संस्थेच्या कार्यक्षेत्रात असलेल्या गावातील प्रमुख ठिकाणी डकवून प्रसिध्द केली पाहिजे. त्याच प्रमाणे सदर नोटीस डकविल्याचा पंचनामा केला पाहिजे, पंचनामा करताना तो गावच्या पोलीस पाटील/सरपंच/तलाठी/ग्रामसेवक/स्थानिक स्वराज सस्थांचे सदस्य यापैकी किमान दोन प्रतिनिधीच्या समक्ष पंचनामा केला पाहिजे. वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटिस सभासदाला बजावल्याचा पुरावा संस्थेच्या दप्तरी ठेवला पाहिजे. सदर नोटिशीत सभेची तारीख,नेमकी वेळ,सभेचे ठिकाण व सभेमध्ये केली जाणारी कामे नमुद केली पाहिजेत. संस्थेचा अध्यक्ष व त्याच्या गैरहजेरीत समितीचा उपाध्यक्ष यांनी सचिवासह नोटीशीवर सहया केल्या पाहिजेत.

1. सर्वसाधारण सभेत हजर असलेल्या सदस्यापैकी दोन तृतीयांश सदस्यांच्या परवानगीने कार्यक्रम पत्रिकेत दाखल नसलेल्या विषय कोणाही सभेपुढे मांडता येतील.

2. कोणत्याही साधारण सभेत एकूण सदस्यांच्या संख्येत दोन पंचमांश अगर पंचवीस (यापैकी कमी संख्या असतील एवढे) सदस्य गणपूर्ती (कोरम) करीता आवश्यक असतील.

3. संस्थेचे अध्यक्ष हे अधिमंडळाची वार्षिक बैठकीचे अध्यक्ष राहतील, अध्यक्ष गैरहजर असतील तेव्हा उपाध्यक्ष हे अध्यक्ष म्हणून काम पाहतील. ज्यावेळी अध्यक्ष व उपाध्यक्ष दोघेही गैरहजर असतील त्यावेळी हजर असणा-या सभासदांमधून त्या सभेपुरता अध्यक्ष निवडला जाईल.

4. अधिनियम कलम 27 व नियम क्रमांक 60 मधील तरतुदींनुसार साधारण सभेत मतदान केले जाईल. सभेस हजर असणा-या प्रत्येक सदस्यास एकापेक्षा जास्त मत देण्याचा अधिकार असणार नाही. ज्या कर्जदार सभासदाने आपल्या अनामत/कर्ज रक्कम परतफेडीचे लागोपाठ दोन अगर जादा हप्ते थकविले असतील तो मतदार कलम 27 (10) प्रमाणे मत देण्यास अपात्र राहील. मात्र त्याने आपल्या अनामत/कर्ज परतफेडीसाठी आपला माल आपल्या, भागाच्या खरेदी-विक्री संस्थेकडे अगर संस्कारण संस्थेकडे विक्रीकरिता दिला असेल तर, तो मतदानास अपात्र असणार नाही. मात्र स्वत:च किती किंमतीचा माल विक्रीकरिता दिला आहे याबद्दलचे प्रमाणपत्र त्याने सदर संस्थेकडून आणून दाखल केले पाहिजे. तसेच सभासद क्रियाशील सभासद नसल्यास  त्यास सर्वसाधारण सभेत मतदान करता येणार नाही. अध्यक्षास एक निर्णायक मत असेल. एखाद्या ठरावावर (मतैक्य न झाल्याने) सदस्य विभागले गेले असतील तेव्हा, मतदान करणा-या कोणाही सदस्याला मतमोजणी (पोल) करण्याची मागणी करता येईल. त्यानंतर अध्यक्षाने ती मंजूर केली पाहिजे. समितीच्या अगर इतर निवडणूका उपविधी मध्ये निर्दिष्ट केल्याप्रमाणे गुप्त मतदान पध्दतीने करावयाच्या असल्यास त्यांचे निकाल

**सोडून प्रत्येक ठरावाचा निकाल हात उभारुन केलेल्या मतदानावरुन केला जाईल. मतदान करणा-या सदस्यांच्या बहुमताने प्रत्येक ठराव मंजूर केला जाईल.**

**5. साधारण सभेतील मतदानाचा अधिकार:- क्रियाशील सभासदालाच साधारण सभेमध्ये हजर राहण्याचा, कामकाजात भाग घेण्याचा व मतदानाचा अधिकार राहील.**

**अ. मतदानाचा अधिकार मतदाराने स्वत: बजाविलेला पहिजे. दुस-यास अधिकार देऊन मतदान करता येणार नाही.**

**ब. एकापेक्षा जास्त व्यक्तींनी भागाचा दाखला एकत्रित धारण केला असेल तर, भागाच्या दाखल्यास ज्याचे नाव पहिले असेल त्यास, तो सभेस गैरहजर असेल तर भाग दाखल्यात दुस-या क्रमांकाने नाव असणा-यास, दोघेही गैरहजर असतील तर तिस-या क्रमांकाने नाव असणा-या आणि अशाच क्रमांकाने दाखल्यास अगोदर नावअसलेला गैरहजर असेल तर त्याच्यानंतर नाव असणा-या पण सभेस हजर असणा-या अशा सज्ञान इसमालाच सभेत मतदानाचा अधिकार राहील.**

**क. कोणत्याही सहयोगी/अक्रियाशील सदस्याला मतदानाचा अधिकार असणार नाही.**

**ड. थकबाकीदार सभासदास संस्थेच्या साधारण सभेच्या कामकाजात मतदान करण्याचा अधिकार असणार नाही.**

**6. सर्वसाधारण सभेत पास झालेल्या कोणत्याही ठरावात बदल करण्यासंबंधीचे ठराव, साधारण सभेत पास झालेल्या मूळ ठरावाच्या**

**तारखेपासून सहा महिन्यांच्या आत नोंदणी अधिकारी यांच्या परवानगीशिवाय कोणत्याही साधारण सभेत आणता येणार नाही.**

7. **संस्था ज्या इतर संस्थांची सदस्य झाली असेल अशा संस्थांच्या साधारण सभांना संस्थेतर्फे प्रतिनिधी म्हणून हजर राहण्याबद्दल व मत देण्याबद्दल अधिनियम कलम** 27 **च्या तरतुदींना अधीन राहून, संस्था वेळोवेळी ठरवेल.**

**मात्र अक्रियाशील/सहयोगी सदस्याला अशा रितीने प्रतिनिधी म्हणून पाठविता येणार नाही. तसेच निबंधकाने नियुक्त केलेल्या प्रशासकास मतदानाचा अथवा संस्थेचे वतीने निवडणूक प्रक्रियेत भाग घेण्याचा अधिकार असणार नाही. अशा वेळी प्रशासक विशेष सर्वसाधारण सभा बोलवून सभासद प्रतिनिधीची नेमणुक करेल.**

8. **वृत्तांत पुस्तकांत चिटणीसाने सर्वसाधारण सभेत वृत्तांत अशी सभा पार पडल्यापासून पंधरा दिवसांचे आत लिहून लगतच्या समिती सभेत अंमलबजावणीसाठी ठेवला पाहिजे.**

20. **अधिमंडळाची वार्षिक बैठकीपुढे कायदा कलम** 75 (2) **नुसार आवश्यक ती विवरणपत्रे ठेवणे अनिवार्य आहे.**

21. **कायदा कलम** 75 (4) **नुसार अधिमंडळाची वार्षिक बैठकी पुढे वैधानिक लेखापरिक्षण अहवाल ठेवणे अनिवार्य आहे. तसेच अधिमंडळाची वार्षिक बैठकीत नियम** 62 **अन्वये (न ) नमुन्यात तयार केलेली नफा तोटापत्रके**

**सादर करण्यात येतील तसेच मागील लेखापरिक्षण अहवालाचा दोषदुरुस्ती अहवालास अधिमंडळाची वार्षिक बैठक ची मान्यता घेण्यात येईल.**

22. **अधिमंडळाची वार्षिक बैठकच्या मान्यतेने सहकारी संस्थेतील अंतर्गत वाद तक्रारी सोडविण्यासाठी संस्था स्थरावर कायदा कलम** 90 (अ) **नुसार तक्रार निवारण समितीची नियुक्ती करण्यात येईल. सदर समिती मध्ये संचालक नसलेल्या तीन क्रियाशिल सदस्याची नेमणुक करण्यात येईल. समितीने संस्थेतील वाद सोडविण्यासाठी समुपदेशन, लवाद, न्यायालयीन तडजोड (लोक अदालत) मध्यस्थी इत्यादी प्रकारे तडजोड करुन तक्रार निवारण समितीने शक्यतो तीन महिन्याच्या आत सुनावणी घेऊन निर्णय घेईल.**

**कलम** 75 " (2 **क) संस्था आपल्या अधिमंडळाच्या वार्षिक बैठकीत, राज्य शासनाने मान्यता दिलेल्या नामिकेमधुन, कलम** 80 **मध्ये निर्धारित केल्याप्रमाणे किमान अर्हता व अनुभव असणा-या लेखापरीक्षकाची किंवा लेखापरीक्षण करणा-या संस्थेची चालू वित्तीय वर्षासाठी नेमणुक करील आणि अधिमंडळाच्या वार्षिक बैठकीच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या कालावधीच्या आत, नेमणुक केलेल्या लेखापरीक्षकाचे नांव आणि संस्थेच्या लेख्यांचे लेखापरीक्षण करण्यासाठीची त्याची लेखी संमती हे विवरणाच्या स्वरुपात निबंधकाकडे दाखलही करील.**

23. **सर्वसाधारण सभेने करावयाच्या कामात खालील कामाचा समावेश होतो.**

1. संस्थेच्या मागील सालच्या कामाचे, अधिनियम कलम क्रमांक 75 मधील तरतुदीनुसार तयार केलेले प्रतिवृत्त व नियम क्रमांक 61 व 62 मधील तरतुदीनुसार तयार केलेली त्या सालची जमा व खर्च, नफा व तोटा आणि जिंदगी व कर्ज दाखविणारी पत्रके समितीकडून घेणे व ती नफयाच्या विभागणीसह मंजूर करणे अगर त्यात जरुर वाटतील त्या दुरुस्त्या करुन मंजूर करणे.

## 13.**संचालक मंडळ:**

13.1 सहकारी कायद्याच्या तरतुदीनुसार खालीलप्रमाणे संघाचे संचालक मंडळ राहील.

| | |
|---|---|
| 13.1.1 सामान्य सभासदांनी तालुकावार निवडलेले प्रतिनिधी<br>(संघाच्या कार्यक्षेत्रातील तालुक्यांच्या संख्येएवढे) | - |
| 13.1.2 अनुसूचित जाती/जमाती | 1 |
| 13.1.3 महिला प्रतिनिधी | 2 |
| 13.1.4 इतर मागास वर्गीय | 1 |
| 13.1.5**भटक्या** विमुक्त जाती व जमाती व विशेष मागासप्रवर्ग | 1 |
| एकुण: | - |

13.1.6 अनुसूचित जाती/जमाती, महिला प्रतिनिधी, इतर मागास वर्गीय, भटक्या विमुक्त जाती व जमाती व विशेष मागासप्रवर्ग यांची निवड संपूर्ण जिल्हा मतदार संघामधून केली जाईल.

13.1.7 संचालक मंडळ मच्छिमार सहकारी संस्थांशी संबंधित असणा-या व मच्छ व्यवसायातील तज्ञ समजली जाईल अशा एका व्यक्तिचा तज्ञ संचालक म्हणून नियुक्ती करु शकेल तसेच एका कार्यलक्षी संचालकाची स्विकृती करु शकेल.

13.1.8 पोटनियमानुसार नियुक्त केलेल्या तज्ञ संचालकांस चेअरमन निवडीचे वेळी वा तत्सम कामकाजाचे वेळी कामकाजात भाग घेता येणार नाही. संचालक मंडळ एकूण ---- सदस्यांचे राहील.

**सदर व्यवस्थापकीय समिती मध्ये दोन तज्ञ संचालक नियुक्त करता येतील सदर संचालकांना संस्थेच्या निर्णय प्रक्रियेत भाग घेता येईल. मात्र त्यांना अध्यक्ष/उपाध्यक्ष या पदासाठी च्या निवडणूकीत मतदान करता येणार नाही.**

**कार्यलक्षी संचालक हा संस्थेच्या नोकरीत असलेला व व्यवस्थापनातील असावा कार्यलक्षी संचालकांना संचालक मंडळाच्या निवडणूकीत अथवा संचालक मंडळाच्या सभेत मतदानाचा अधिकार असणार नाही. जर संचालक मंडळाची संख्या 17 पर्यंत असले तर कार्यलक्षी संचालक संख्या 1 असावी. 18 ते 21 संचालक संख्या असल्यास कार्यलक्ष्यी संचालकाची संख्या दोन असावी.**

**अ) व्यवस्थापक समितीची निवडणूक दर पाच वर्षानी होईल.**

**समितीच्या मुदतीत राखीव जागावरील रिक्त झालेले संचालक पद हे त्या प्रवर्गाच्या सभासदा मधून भरणे आवश्यक राहील. संचालकमंडळ सभेची गणपुर्ती होण्यांस एकुण समीती सदस्य संखेच्या (निवडुन दयावयाच्या)अर्धापेक्षा अधिक एक सदस्यसंख्या आवश्यक राहील सदर गणपूर्तीच्या गणनेत तज्ञ संचालक व कार्यलक्षी संचालक यांचा समावेश होणार नाही.**

(1) **प्रत्येक संस्थेच्या समितीवर महिला सदस्यांचे प्रतिनिधित्व करण्यासाठी सदस्य म्हणून व्यक्तींचा अंतर्भाव असणा-या आणि व्यक्तींच्या अशा वर्गातील किंवा प्रवर्गातील सदस्य असणा-या प्रत्येक संस्थेच्या समितीवर महिलांकरिता दोन जागा राखून ठेवण्यात येतील.**

(2) **संस्थेची कोणतीही महिला सदस्य किंवा सदस्य -संस्थेच्या समितीची कोणतीही महिला सदस्य, मग ती निवडून आलेली, स्वीकृत केलेली किंवा नामनिर्दिष्ट केलेली असावी. महिला प्रतिनीधीकरीता राखून ठेवण्यात आलेल्या जागेकरिता निवडणूक लढविण्यास पात्र असेल.**

(3) **अशा राखून ठेवण्यात आलेल्या जागांकरिता कोणतीही महिला सदस्य किंवा यथास्थिति कोणत्याही महिला सदस्य निवडून आलेल्या नसतील त्याबाबतीत, अशी जागा किंवा अशा जागा, निवडणूक लढविण्यासाठी पात्र असलेल्या महिला सदस्यांमधून स्वीकृत करुन घेऊन भरण्यात येतील.**

(4) **केवळ महिला सदस्य असणा-या संस्थेच्या समितीला या कलमातील कोणतीही गोष्ट लागू होणार नाही.**

**ब) निवडलेली समिती 5 वर्षेपर्यंत अधिकारावर राहील.**

**क) थकबाकीदार आणि अक्रियाशिल सभासदाना मतदानाचा अधिकार असणार नाही.**

13.2 दरवर्षी वार्षिक सर्वसाधारण सभेनंतर होणारी संचालक मंडळाची पहिली सभा/वार्षिक सभेनंतर एक महिन्याच्या आत बोलाविली पाहिजे. कार्यकारी संचालक अथवा तत्सम अधिकार असलेल्या अधिका-यांनी ती सभा बोलवावी.

13.3 संघाच्या चेअरमनची निवड पोटनियम क्र. 13.1.1, 13.1.2., व 13.1.3., व 13.1.4, 13.1.5 मधुन निवडून आलेल्या प्रतिनिधी मधूनच केली जाईल.

13.4 निवडून आलेल्या संचालक मंडळाची मुदत, कायद्यातील तरतुदीस पात्र राहून पाच वर्षाची राहील.

13.5 निवडून आलेले संचालक मंडळ पुढील संचालक मंडळ अधिकारावर येईपर्यंत अस्तित्वात राहील.

13.6 संचालक मंडळाच्या सभेस संघाचे चेअरमन अध्यक्ष राहतील. तथापि चेअरमनच्या गैरहजेरीत हजर असलेल्या संचालकांनी निवडलेले संचालक त्या सभेचे अध्यक्ष म्हणून कामकाज चालवतील.

13.7 संचालक मंडळाच्या सभा आवश्यक असेल तितक्या वेळा बोलविता येतील परंतु संचालक मंडळाची महिन्यातून एक तरी सभा घेतली पाहिजे.

13.8 सर्वसाधारणपणे संचालक मंडळाची सभा, सात दिवसांच्या पूर्व सूचनेनुसार बोलविण्यात येईल तथापि आवश्यकतेनुसार कमीत कमी तीन दिवसांच्या पूर्वसूचनेवरुन संचालक मंडळाची सभा बोलविता येईल.

13.9 एकूण निर्वाचित संचालकांच्या संख्येच्या निम्मे अधिक एक इतके संचालक सभेस उपस्थित असल्यास सभेची गणपूर्ती पूर्ण होईल.

13.10 प्रत्येक संचालकास एक मत देण्याचा अधिकार राहील. समान मताचे वेळेस चेअरमन यांना एक जादा निर्णायक मत देण्याचा अधिकार राहील.

13.11 संचालक मंडळाच्या सभेतील निर्णय हजर संचालकांच्या बहुमताने घेतले जातील. समान मताचे वेळेस चेअरमन यांना एक जादा निर्णायक मत देण्याचा अधिकार राहील.

13.12 संचालक मंडळाच्या लेखी पूर्वपरवानगीशिवाय, एखादा संचालक संचालक मंडळाच्या लागोपाठ तीन सभांना गैरहजर राहिल्यास त्या संचालकाचे संचालक मंडळावरील सदस्यत्व आपोआप रद्द होईल. अशा प्रकारे रिकाम्या झालेल्या पदांची माहिती, संबंधित अधिका-यांना एक महिन्याच्या आत कळविण्यात येईल.

13.13 एखादा संचालक, स्वत:चे व्यक्तिगत हितसंबंध असलेल्या विषयाच्या चर्चेच्यावेळी हजर राहू शकणार नाही व त्यावर तो मतही देऊ शकणार नाही.

13.14 काही अत्यंत निकडीच्या कामासाठी संचालक मंडळाची वेळेवर सभा घेता आली नाही तर निदान पोटनियम 18.11 मधील संख्येइतक्या संचालकांकडे

सर्क्युलर पाठवून त्यांची मते घेऊन ठराव करावेत. असे ठराव संचालक मंडळाच्या पुढील सभेत मंजूरीसाठी ठेवण्यात यावेत. सर्क्युलर ठरावावर सहया करणे याचा अर्थ संचालक मंडळाच्या सभेस आहे असे गृहित धरले जाणार नाही. सर्क्युलर ठरावाद्वारे पोटनियम बदलणे, सभासदास कमी करणे, एखाद्या सभासदास कर्जे देणे अगर नवीन सभासद करुन घेणे, अविश्वासाचा ठराव आणणे या बाबींवर निर्णय घेता येणार नाही.

13.15 संचालक मंडळ किंवा संचालक मंडळाचा सदस्य याच्या नेमणुकीबाबत काही दोष असल्याचे मागाहून आढळून आले तरीही संचालक मंडळ किंवा संचालक या नात्याने केली गेलेली मंडळाची सर्व कामे त्या मंडळाची अगर त्या संचालकाची निवडणूक योग्य रितीने झाली होती असे गृहित धरुन कायदेशीर समजण्यात येतील.

13.16 संचालक मंडळास आपले अभ्यास दौरे निबंधकाच्या पूर्व परवानगीने करता येतील.

13.17 आवश्यक असल्यास संचालक मंडळाच्या बहुमताने संघाच्या उद्देशपूर्तीच्या अनुषंगाने काम करणा-या संघटनांचे प्रतिनिधी संचालक मंडळ बैठकीस बोलाविता येतील. अशा निमंत्रित सदस्यांना संबंधित विषयाबाबतच्या चर्चेत भाग घेता येईल.

13.18 संचालक मंडळ निवडणूकीसाठी तालुकानिहाय मतदार संघ राहतील. कोणत्याही तालुक्यातील अधिकृत संस्था प्रतिनिधींना महाराष्ट्र सहकारी कायदा

नियम व पोटनियमातील तरतुदीस पात्र राहून निवडणूकीस उमेदवार म्हणून उभे राहता येईल.

13.19 संघाच्या संचालक मंडळावर निवडून येण्यासाठी कोणत्याही सभासद संस्थेच्या प्रतिनिधीची त्या संस्थेने खालील बाबींची पूर्तता केल्याशिवाय निवडणूकीस उभे राहता येणार नाही.

1) प्राथमिक मत्स्य व्यवसाय सहकारी संस्थेने अधिनियमाच्या कलम 27(3)ची पुर्तता करणे आवश्यक आहे.

2) सभासद संस्थेचे नाव मतदारांच्या यादीत समाविष्ट असले पाहिजे.

3) संघाचे कोणत्याही प्रकारचे देणे अगोदरच्या तीन वर्षात लवादाकडून वसूल करण्यात आले नसले पाहिजे.

4) सभासद संस्था ऑडिट झालेल्या शेवटच्या वर्षी अ अथवा ब ऑडिट वर्गात असली पाहिजे

5) सभासद संस्थेच्या पंचकमिटीने आपल्या प्रतिनिधीला संघाचे संचालक मंडळाची निवडणूक लढविणेबाबत अधिकार दिल्याबद्दलचा ठराव तसेच दुस-या कोणत्याही प्रतिनिधीला प्रतिनिधित्व करण्याचा अधिकार दिलेला नाही. अशा प्रकारचा ठराव संघास मिळालेला असला पाहिजे.

6) सभासद संस्थेने स्थानिक किरकोळ विक्री वगळता संघाव्यतिरिक्त इतर कोणासही मत्स्य पुरवठा केला नसला पाहिजे.

## 14. संचालक मंडळाचे अधिकार, कामे व जबाबदा-या

1. सदस्य होण्यासाठी व भागासाठी आलेल्या अर्जाचा निकाल करणे.

2. कर्ज काढणे, ठेवी स्वीकारणे व त्यांच्या अटी ठरविणे.

3. भागांच्या व कर्जाच्या येणा-या रकमांचा वसूल घेणे व आलेला वसूल कशा रीतीने जमा करावयाचा ते ठरविणे.

4. कर्ज मागणीचे अर्जाचा विचार करणे.

5. कर्ज देणे, किंवा नाकारणे, ते द्यावयाचे असल्यास कोणत्या कामाकरिता, किती मुदतीपर्यंत व कोणत्या तारणावर द्यावयाचे ते अधिनियम कलम क्र. 44 व नियम क्र. 42 व 43 मधील तरतुदी विचारात घेऊन ठरविणे.

6. विवक्षित क्षेत्रापुरत्या अगर त्या कामाकरिता उपसमित्या नेमणे.

7. कर्जाच्या विनियोगावर देखरेख ठेवणे.

8. थकलेले कर्ज /अनामत रक्कमा विक्रीच्या रकमा वसूल करण्याची तजवीज करणे. कर्ज थकवून अगर अन्य रीतीने उपविधीचे उल्लंघन केल्याबद्दल सदस्यावर कशा रीतीने व कोणती करावयाची ते ठरविणे.

9. कर्ज फेडीस तहकुबी मिळण्याकरिता आलेल्या अर्जाचा विचार करणे.

10. संस्थेच्या कामासंबंधी होणारा खर्च मंजूर करणे.

11. व्यवस्थापकाकडून वेळच्या वेळी हिशेब लिहून घेणे, व तपासणे व रोख शिल्लक मोजून पाहणे.

12. **अधिनियम कलम** 75 **व नियम क्र.** 61 **मधील तरतुदीनुसार आर्थिक वर्ष संपल्यानंतर कलम** 79 **मध्ये नमुद केलेली खालील विवरणपत्रे नोंदणी अधिकारी यांचेकडे पाठविल-**

**अ. संस्थेच्या कार्याची माहिती देणारा वार्षिक अहवाल**

**ब. लेखापरीक्षण अहवाल.**

**क. नफा वाटणी.**

**ड. उपविधी दुरुस्ती असल्यास.**

**इ. वार्षिक सभेची तारीख व निवडणूक असल्यास त्याची तारीख.**

**ई. निबंधकाने कायदा/नियम/उपविधी अनुसार विचारलेली इतर माहिती.**

**फ. लेखापरीक्षकाची नेमणुक व त्याची संमती.**

12. (1 **क) प्रत्येक संस्थाप्रत्येक वित्तिय वर्ष समाप्त होण्याच्या सहा महिन्यांच्या आत तिच्या अशा लेख्यांची संबंधित विवरणपत्रे त्याने प्राधिकृत केलेल्या व्यक्तिकडे दाखल करील. विवरणपत्रामध्ये पुढील बाबींचा समावेश असेल:-**

**(क) तिच्या कार्यांचा वार्षिक अहवाल.**

**(ख) त्याच्या लेखांची लेखापरिक्षित विवरणे.**

**(ग) संस्थेच्या अधिमंडळाने, मान्यता दिल्याप्रमाणे शिल्लक रकमेचा विनियोग करण्यासाठीच्या योजना.**

(घ) संस्थेच्या उपविधींच्या सुधारणांची यादी, कोणतीही असल्यास.

(ड) अधिमंडळाची बैठक घेण्याची आणि निवडणुका घेण्याचा दिनांक संबधात प्रतिज्ञापन.

(च) या अधिनियमाच्या तरतुदींपैकी कोणत्याही तरतुदींनुसार निबंधकाला आवश्यक असेल अशी कोणतीही अन्य माहिती.

(1 ख) प्रत्येक संस्था अधिमंडळाच्या वार्षिक बैठकीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या कालावधीत अधिमंडळाच्या लेखी संततीने, तिच्या बैठकीत, राज्य शासनाने याबाबतीत मान्यता दिलेल्या नामिकेतून नियुक्त केलेल्या लेखा परीक्षकाच्या किंवा लेखा परीक्षण व्यवसाय संस्थेच्या नावाशी संबंधित विवरणपत्रे देखील दाखल करेल."

13. अधिनियम कलम क्रमांक 75 व नियम क्रमांक 61 मधील तरतुदीनुसार वार्षिक अहवाल व ताळेबंद पत्रके वर्ष संपल्यावर 45 दिवसांत तयार करणे व ते तयार केल्यापासून 15 दिवसांत निबंधकाकडे व अधिमंडळ बैठकित नेमलेले लेखा परीक्षक यांचेकडे पाठविणे.

## 15. संचालक मंडळाची जबाबदारी-

15(क) राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाला, तिची मुदत संपण्याच्या किमान सहा महिन्यांपूर्वी आपला पदावधी संपण्याबाबत कळवील.

**15(ख) समितीमध्ये किंवा तिच्या पदाधिका-यांमध्ये निर्माण झालेल्या कोणत्याही नैमित्तिक रिक्त पदाबाबत असे रिक्त पद निर्माण झाल्यापासून पंधरा दिवसांच्या आत कळविल.**

**15(ग) राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाने विहित केलेल्या दिनदर्शिकेनुसार राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाला आवश्यक असणा-या अशा नोंदवहया, अभिलेख आणि माहिती पुरविल.**

**15(घ) निवडणुका घेण्यासाठी मतदार यादी सुरळीतपणे तयार करण्याकरिता आवश्यक ती सर्व मदत, सहाय्य व सहकार्य पुरवील.**

15.1 संघाची सर्व प्रकारची धोरणे ठरविण्याचा संपूर्ण अधिकार संचालक मंडळास राहील. संचालक मंडळ सर्व प्रकारचे अधिकार वापरुन करार दस्तऐवज व त्यासाठी आवश्यक असलेल्या बाबींची पूर्तता करण्याची वा करवून घेण्याची व्यवस्था करेल. संघाचे उद्देश पूर्तीसाठी आवश्यक असलेल्या सर्व तरतुदी व कार्यवाही आणि कायदा नियम व पोटनियम यास अधिन राहून संघाचा विकास व हितसंबंध वृध्दीसाठी सर्व प्रकारच्या योजना आखण्याचा व राबविण्याचा अधिकार संचालक मंडळावर राहील.

15.2 या पोटनियमान्वये दिलेल्या सर्वसाधारण अधिकारास बाधा न आणता संचालक मंडळाचे अधिकार व कर्तव्य खालील प्रमाणे आहेत.

15.2.1 मागील सभेचे इतिवृत्तांत वाचून कायम करणे.

15.2.2 सभासदत्व भाग, भाग हस्तांतर, ऋणपत्रे इत्यादीसाठी आलेल्या अर्जावर निर्णय घेणे.

15.2.3 कर्जे व ऋणपत्रे उभारणे, ठेवी स्वीकारणे व त्यांच्या शर्ती निश्चित करणे.

15.2.4 सभासदांकडून त्यांचे संघाशी असलेल्या व्यवहाराच्या प्रमाणात व पोटनियमातील तरतुदीनुसार भागभांडवल जमा करणे आणि किंवा ऋणपत्रे स्वीकारणे.

15.2.5 मासिक/त्रैमासिक हिशोबपत्रके महसूल आणि भांडवली खर्च मंजूर करणे.

15.2.6 लेखापरिक्षा अहवालावर विचार करणे आणि दोषदुरुस्ती अहवाल पाठविणे.

15.2.7 31 मार्च रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाचे ताळेबंद, नफा-तोटा पत्रके मंजूर करुन प्रमाणित करणे. नफा विभागणीची शिफारस करणे आणि वार्षिक अहवाल, मागील वर्षाची प्रगती अहवाल, सभांची कार्यक्रमपत्रिका आणि पुढील वर्षाचे अंदाजपत्रक वार्षिक सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्यासाठी सादर करणे.

15.2.8 रोख, शिल्लक माल, भांडार माल, महत्वाचे दस्तऐवज व रोखे हाताळणा-या कर्मचा-यांकडून चोरी, अफरातफर, नुकसान होऊ नये यासाठी पुरेशी सुरक्षिततेची व्यवस्था करणे.

15.2.9 संघाच्या मालमत्तेचा विमा उतरविणे

15.2.10 कर्ज व तत्संबंधी आलेल्या अर्जावर विचार करणे, कायदा व नियम यातील तरतुदीस अधिन राहून व्याज व दंड व्याजाचा दर ठरविणे, कर्जाच्या मुदतवाढीस मंजूरी देणे, व्याज आकारणीची पध्दत ठरविणे.

15.2.11 सर्वसाधारण सभेच्या पुर्वपरवानगीने संघाच्या उपयोगाकरिता जमिनी, इमारती, यंत्रसामग्री, औजारे इ. खरेदी करुन अगर भाडेपट्टीने जमिनी, इमारती खरेदीस मंजूरी देणे, मालजिनसा ठेवण्यासाठी गोदामे उभारणे अथवा भाडेपट्टीने संपादन करणे, कार्यालयासाठी इमारती बांधणे अथवा भाडयाने घेणे, सभासद संस्थांना संघाची स्थावर व जंगम मालमत्ता, मालजिनसा विकणे अथवा भाडेपट्टीने देणे.

15.2.12 संघाचे कामकाज सुरळित चालण्यासाठी प्रशासकीय यंत्रणा निर्माण करणे व संघाच्या कर्मचा-यांसाठी सेवानियम करणे. निरनिराळी पदे, आवश्यकतेनुसार निर्माण करणे, कर्मचा-यांचे सेवानियम व वेतनश्रेणी ठरविणे व कार्यकारी संचालक व वरिष्ठ अधिकारी यांची नेमणूक करणे याबाबत संचालक मंडळ यासाठी प्रस्थापित केलेल्या तज्ञ मंडळाच्या शिफारशी विचारात घेईल.

15.2.13 संचालक मंडळ खालील बाबींवर विचार करण्यासाठी एक तज्ञ मंडळ नियुक्त करेल.

अ. प्रशासकीय यंत्रणेचे स्वरुप

ब. सेवक नेमणुकीसाठी शैक्षणिक पात्रता, अनुभव सेवानियम व वेतनश्रेणी ठरविणे.

क. वरिष्ठ अधिका-यांसाठी शैक्षणिक पात्रता, अनुभव वेतनश्रेणी व कामकाजाचे स्वरुप ठरविणे.

ड. कार्यकारी संचालक व वरिष्ठ अधिका-यांची नेमणूक करण्याबाबत संचालक मंडळावर शिफारस करणे.

इ. कार्यकारी संचालक/वरिष्ठ अधिकारी यांची नेमणुक सहा महिन्यापेक्षा अधिक कालावधीकरीत प्रभारी स्वरुपाची असणार नाही.

**तज्ञ मंडळात खालील व्यक्तींचा समावेश राहील.**

आयुक्त, मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य मुंबई किंवा त्यांचे प्रतिनिधी (निमंत्रक)

1. उपनिंबंधक (मत्स्य)सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य मुंबई किंवा त्यांचे प्रतिनिधी
2. चेअरमन (सदस्य)
3. महाराष्ट्र राज्य मत्स्यव्यवसाय सहकारी संघ यांचा प्रतिनिधी (सदस्य)

15.2.14 तज्ञ मंडळाच्या शिफारशीनुसार वरिष्ठ अधिका-यांची नेमणूक करणे, अशा अधिका-यांना शिक्षा करणे, निलंबित करणे अथवा काढून टाकणे.

15.2.15 कार्यकारी संचालकांची तज्ञ मंडळाच्या शिफारशीनुसार नेमणूक करणे तसेच संचालकमंडळाच्या ठरावाने निलंबित करणे. कार्यकारी संचालक पदासाठी खालील पात्रता राहील.

1. मत्स्य व्यवसाय तंत्रशाखेची पदवी किंवा पशुसंवर्धन, कृषि व फूड टेक्नॉलॉजी, इंजिनियरिंग यापैकी एका शाखेतील पदवीधर वरील पात्रतेबरोबरच व्यवस्थापन शाखेतील (बिझनेस मॅनेजमेंट) आणि कायदा पदवीधर असणा-यांना प्राधान्य दिले जाईल.

2. दहा वर्ष मत्स्य व्यवसाय अनुभव त्यापैकी तीन वर्षे मोठया कारखान्यात काम केले असले पाहिजे.

3. उमेदवार हा व्यवस्थापन निष्णांत असला पाहिजे किंवा मत्स्य व्यवसाय किंवा सहकारी खात्यातील वरील पात्रता धारण करणारे अधिकारी.

**15.2.16** संचालक मंडळाला कार्यकारी संचालक व वरिष्ठ अधिका-याव्यतिरिक्त संघाचे इतर सेवक नेमण्याचा, निलंबित करण्याचा अधिकार राहणार नाही. तथापि त्यांना कमी करण्यापूर्वी कार्यकारी संचालकाने संचालक मंडळाची मंजूरी घेतली पाहिजे.

**15.2.17** शासन व इतर संघटनांशी दस्तऐवज, खरेदी विक्री, हस्तांतर इ. व्यवहार करणे व यासाठी दोन किंवा अधिक संचालकांना अधिकार प्रदान करणे.

**15.2.18** मालजिनसांची उधारीवर विक्री करणेचा अधिकार कार्यकारी संचालकांना देणे.

15.2.19 निबंधकांनी विचारणा केल्यास संलग्न व्यवस्थापन स्वीकारण्यास मंजूरी देणे.

**15.2.20** कर्मचा-यांच्या कल्याणासाठी विश्वस्तनिधी स्थापन करणे. त्यासाठी भांडवल उभारणे व निधीस साहाय्य करणे.

**15.2.21** संघाच्या वतीने किंवा संघाविरुध्द दाखल केलेली कायदेशिर कार्यवाही सुरु करणे, चालविणे, बचाव करणे, तडतोड करणे किंवा मागे घेणे याबाबतचे सर्व अधिकार संचालक मंडळाला राहतील तसेच एखादी कर्जाऊ येणे रक्कम आणि इतर कोणत्याही प्रकारचे संघाचे किंवा संघाविरुध्द दावे योग्य त्या तडजोडीने सोडविण्याचा अधिकार संचालक मंडळास राहील.

15.2.22 संचालक मंडळाच्या मते एखाद्या सभासदाची वर्तणूक संघास अहितकारक आहे असे वाटल्यास सदर सभासदास 3/4 मतांनी काढून टाकण्याची सर्वसाधारण सभेस शिफारस करणे.

15.2.23 संघाने स्वत:साठी एक मुद्रा (सील) तयार करुन ती संघाच्या कार्यकारी संचालक यांच्याकडे सुरक्षिततेसाठी ताब्यात ठेवावी. संघाच्या संचालक मंडळापैकी एक संचालक यांच्या उपस्थितीत त्यांनी दस्तऐवजावर किंवा करारपत्रकावर सही करुन ही मुद्रा मोर्तब करावी.

15.2.24 संचालक मंडळास पोटनियमानुसार प्राप्त झालेले अधिकार कर्तव्ये यापैकी सर्व किंवा काही अधिकार/कर्तव्ये संघाच्या वरिष्ठ अधिका-यांना प्रदान करण्यास मंजूरी देणे.

15.2.25 कार्यकारी संचालकांना पोटनियमानुसार प्राप्त झालेले अधिकार कर्तव्ये यापैकी सर्व किंवा काही अधिकार/कर्तव्ये संघाच्या वरिष्ठ अधिका-यांना प्रदान करण्यास मंजूरी देणे.

15.2.26 संचालक मंडळास आवश्यक वाटल्यास संघात झालेले अपहार किंवा अहितकारक कृत्ये इ. बाबत चौकशी करण्यासाठी कमाल चार सदस्यांची एक तदर्थ समिती नियुक्त करता येईल. तथापि अशा समितीमध्ये किमान एक नियुक्त संचालक असेल. या समितीची मुदत ठराविक काळासाठी मर्यादित राहील.

15.2.27 कामकाज व्यवस्थितपणे चालविण्यासाठी सहकारी कायदा, नियम पोटनियम यांना अधिन राहून सुसंगती असे पूरक नियम तयार करण्याचा संचालक मंडळास अधिकार राहील.

15.2.28 संघाचे कामकाजाची वेळ ठरविणे, कार्यालयासाठी वार्षिक सुट्टया जाहीर करणे.

15.2.29 संलग्न संस्थांच्या कामावर देखरेख ठेवणे व आवश्यक वाटल्यास त्यासाठी उपनिबंधक, सहकारी संस्था (**मत्स्य**) महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे मंजूरीने शुल्क ठरविणे व वसूल करणे.

15.2.30 संघाच्या मालजिनसीचे संकलन, उत्पादन, वितरण, विक्री इत्यादी व्यवहाराबाबत नियम करणे.

15.2.31 एखाद्या संलग्न संस्थेच्या सभासदाने संघाला भेसळयुक्त मालजिनसा पुरविल्याने किंवा संघाशी केलेल्या करारातील अटींचे पालन न केल्यास त्याचे त्या संस्थेतील सभासदत्व रद्द करविण्यासंबंधी संलग्न संस्थेस शिफारस करता येईल.

15.2.32 कर्ज पुरवठा व अनुदान देणा-या व अर्थसाहाय्य देणा-या संस्थांनी व संघानी परस्पर मान्य केलेल्या नियम व अटींचे संघाने पालन करण्याची जबाबदारी संचालक मंडळावर राहील.

## 16. **चेअरमन**

16.1 चेअरमनची कामे व अधिकार:-

16.1.1 संघाचे सर्व व्यवहारावर चेअरमन यांचे सर्वसाधारण नियंत्रण व मार्गदर्शन राहील.

16.1.2 संचालक मंडळाची सभा चालविणे.

16.1.3 चेअरमनच्या अधिकृत रजेच्या मुदतीत संचालक मंडळाने निवडलेला सदस्य वरील कामे पाहील.

16.1.4 वरील चेअरमन निवडून येईपर्यंत अधिकारपदावर असलेले चेअरमन संघाचे काम पाहतील.

16.1.5 काही कारणामुळे चेअरमनची जागा रिकामी झाल्यास पंधरा दिवसांच्या आत कार्यकारी संचालक किंवा तत्सम जबाबदारी दिलेला संघाचा अधिकारी अथवा समितीने राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरणास कळविले पाहीजे.

## 17 **कार्यकारी संचालक**

**17.** कार्यकारी संचालक यांचे अधिकार व कर्तव्ये खालीलप्रमाणे राहतील.

17.1.1 संघाचे कामकाज, सेवकवर्ग व प्रशासनावर सर्वसाधारण नियंत्रण ठेवणे, तसेच आवश्यक त्या वेळेस कार्यालयीन आदेश काढणे.

17.1.2 सर्वसाधारण सभा व विशेष सर्वसाधारण सभा पोटनियम क्र. 13 (4) व 13 (5) मधील तरतुदीस अनुसरुन बोलविणे.

17.1.3 संचालक मंडळ व सर्वसाधारण सभेचे सचिव म्हणून काम करणे व अशा सभांचे कार्यवृत्तांत नोंद करुन ठेवण्याची व्यवस्था करणे.

17.1.4 ठरावाची अंमलबजावणी करण्यासाठी जरुर तेथे संबंधितास सूचना देणे.

17.1.5 वरिष्ठ अधिकारी वगळून व इतर सेवकांची मंजूर झालेल्या प्रशासकीय यंत्रणेत कायदा, नियम व पोटनियमातील तरतुदीस अनुसरुन नेमणूक करणे.

17.1.6 वरिष्ठ अधिकारी वगळून संघाच्या सेवकांना शिक्षा देणे, निलंबित करणे व संचालक मंडळाच्या पूर्वपरवानगीने कमी करणे.

17.1.7 संघाच्या सेवकांसाठी आवश्यक ते प्रशिक्षण देण्याची व्यवस्था करणे.

17.1.8 संचालक मंडळाने ठरवून दिलेल्या मर्यादित मालजिनसांची उधारीवर विक्री करणे.

17.1.9 मालजिनसा, वाहतुक, साठवणूक विक्री इ. साठी व्यवस्था करणे.

17.1.10 संघाच्या वतीने शासन व इतर संस्थांशी वाटाघाटी करणे.

17.1.11 संचालक मंडळाने ठरवून दिलेल्या मर्यादित महसूली खर्च करणे.

17.1.12 संघाच्या मालमत्तेचा विमा उतरविणे.

17.1.13 संघाचे हिशोब नियमित पूर्ण करुन ठेवण्याची व्यवस्था करणे.

17.1.14 दर तिमाहीतून एक वेळ रोख शिल्लक व शिल्लक मालाची तपासणी अगर पडताळून पाहण्याची व्यवस्था करणे.

17.1.15 कार्यकारी संचालकांस संघाच्या वतीने धनादेश, हुंडया व इतर वचन पत्रके (निगोशियेबल इंन्स्टूमेंट) व सर्व प्रकारच्या ठेव पावत्यांवर सहया करण्याचा

अधिकार राहील. तसेच त्यांना संघाच्या वतीने बँकातील सर्व प्रकारची खाती चालविता येतील.

17.1.16 संघाच्या वतीने दावा/दावे सुरु करता येईल. तसेच संघाविरुध्दचे दावा/दावे कार्यकारी संचालकांच्या नावे चालतील.

17.1.17 संघाच्या वतीने होणा-या वचन चिठ्ठया व करारनामे कार्यकारी संचालकांच्या नावे राहतील.

17.1.18 कर्जरोखे, करारपत्रे व इतर महत्वाचे कागदपत्रे सुरक्षित ठेवण्याची व्यवस्था करणे.

17.1.19 संचालक मंडळाच्या विचार विनिमय व मान्यतेसाठी वार्षिक अहवाल ताळेबंद, नफातोटा पत्रक व व्यापारी पत्रक तयार करण्याची व्यवस्था करणे.

17.1.20 संचालक मंडळापुढे लेखा परिक्षण अहवाल विचारार्थ ठेवणे व दोषदुरुस्ती करण्यासाठी योग्य ती कार्यवाही करणे. संचालक मंडळाच्या मान्यतेने दोषदुरुस्ती अहवाल लेखानिरिक्षकांकडे पाठविणे.

17.1.21 कार्यकारी संचालकांस आपले काही अधिकार व जबाबदा-या संचालक मंडळाच्या पूर्व परवानगीने संघाच्या वरिष्ठ अधिका-यांवर आवश्यकतेनुसार प्रदान करता येतील. तथापि या बाबतचे अंतिम नियंत्रण व अधिकार कार्यकारी संचालकाकडेच राहतील.

17.1.22 सर्वसाधारण सभेच्या ठरावातील मार्गदर्शनपर सूचना कायदा, नियम व पोटनियमातील तरतुदीस अनुसरुन संघाचा कारभार व्यवस्थितीत चालविण्याचा अधिकार व जबाबदारी कार्यकारी संचालकाची राहील.

17.1.23 कार्यकारी संचालकांच्या अनुपस्थितीत तो पदभार चेअरमनच्या मान्यतेने दुस-या वरिष्ठ अधिका-यास दिला जाईल.

17.1.24 संघाच्या कार्यक्षेत्रातील मत्स्य संकलन, गुणनियंत्रण व वाहतुक यंत्रणा, बर्फ पुरवठा याबाबत सभासदांच्या अडीअडचणींचे निवारण करणे व नियमितपणे संचालक मंडळापुढे अहवाल ठेवणे.

17.1.25 संलग्न संस्थांच्या कामकाजाची तपासणी व देखरेख करण्याची व्यवस्था करणे. संलग्न संस्थांच्या सभासदांना मासळी पुरवठयाचे पेमेंट वेळेवर व नियमानुसार मिळेल याची दक्षता घेणे.

17.1.26 संघाने अंगिकारलेले मत्स्य उत्पादन वाढ, मत्स्यसंवर्धन, समतोल मत्स्य आहार, मत्स्य खादय व मत्स्य बीज विकास त्या अनुषंगाने सेवा राबविणे.

17.1.27 दरवर्षी 31 मार्च रोजी संस्थेच्या स्थावर/जंगम मालमत्तेची मोजदाद करुन घेण्याची व्यवस्था करणे व या कमी अधिकांची यादी तयार करुन संचालक मंडळापुढे विचारार्थ ठेवणे.

17.1.28 कार्यकारी संचालकांस संचालक मंडळाच्या पूर्वपरवानगीशिवाय संघाचे दैनंदिन कामकाज सुरळित चालविण्यासाठी रु. 25,000/- रुपये पर्यंत इतकी रक्कम खर्च करता येईल.

17.1.29 संस्थेची अधिमंडळाची विशेष बैठक दिनांक 30 सप्टेंबर च्या आत आयोजित करणे मागील आर्थिक वर्षातील व्यवहाराची विवरणपत्रके शासनाकडे/संस्था निबंधकाकडे सादर करण्याची जबाबदारी व्यवस्थापक याची आहे.

17.1.30 व्यवस्थापक संस्था निबंधकाकडे दिनांक 30 सप्टेंबर पुर्वी पुढील माहिती सादर करेल.

1. संस्थेच्या कार्याची माहिती देणारे विवरणपत्रक

2. लेखापरिक्षण अहवाल

3. नफा वाटणी.

4. उपविधि दुरुस्ती (असल्यास)

5. वार्षिक सभेची तारीख/निवडणूकीबाबतची माहिती.

6. लेखापरिक्षकाची नेमणुक व त्याची समंती.

7. निबंधकाने कायदा/नियम/उपविधीला अनुसरुन विचारलेल्या माहिती संदर्भात अहवाल सादर करणे.

8. कायदा कलम 24 (अ) नुसार सभासद/ संचालक प्रशिक्षणाबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती सादर करणे.

**9. क्रियाशिल सभासदाच्या नोंदवही प्रतिवर्षी तयार करुन त्यास प्रसिध्दी देणे आवश्यक राहील.**

## 18. व्यापार

18.1 संघ आवश्यक असल्यास सभासद संस्थांना मालजिनसांचा ठराविक पुरवठा करण्यासाठी स्वतंत्र करार करावयास लावून त्याप्रमाणे संस्था कराराच्या अटी पाळतील याकडे लक्ष देईल. एखाद्या संस्थेने हेतुपुरस्सर किंवा निष्काळजीपणामुळे कराराचा भंग केल्यास व त्यामुळे तोटा आल्यास तो सदर संस्थेला भरुन द्यावा लागेल.

## 19. नफयाची विभागणी:

नफयाची विभागणी वार्षिक सर्वसाधारण सभेच्या मंजुरीने महाराष्ट्र सहकारी कायदा नियम व पोटनियमातील तरतुदीस पात्र राहून खालीलप्रमाणे करण्यात येईल.

**19.1** वार्षिक सर्वसाधारण सभेच्या वेळी अगोदरच्या आर्थिक वर्षात मिळविलेला व्यापारी नफा जाहीर करण्यात येईल व त्यात खालीलप्रमाणे रक्कमा वजा केल्या जातील.

**19.2** सर्व प्रकारचे देय व्याज.

19.2.1 कामकाजावरील खर्च.

19.2.2 घसारा.

19.2.3 जमीन सारा, इतर सारे व भाडे.

19.2.4 नियमानुसार कर्मचा-यांचा प्रॉव्हिडंड फंडामध्ये संघाने द्यावयाचा भाग.

19.2.5 कर्मचा-यांच्या ग्रॅच्युईटी व बोनसची तरतुद.

19.2.6 आयकर आणि विक्रीकर यांची तरतुद.

19.2.7 संशयित/बुडित कर्जाबाबत वा इतर येणे, संशयित वा बुडित रक्कमाबाबत आवश्यक ती तरतुद.

19.2.8 महाराष्ट्र सहकारी सोसायटयांचा कायदा 1960 कलम 64,65 व महाराष्ट्र सहकारी सोसायटयांचे नियम 1961 कलम 51 यात नमूद केल्याप्रमाणे सर्व प्रकारच्या तरतुदी.

**19.3** वरील खर्च वजा जाता उरलेला निव्वळ नफा खालीलप्रमाणे विभागला जाईल.

19.3.1 25% रिझर्व्ह फंड (गंगाजळी) म्हणून.

19.3.2 विक्री झालेल्या भाग भांडवलावर सहकारी कायद्याच्या तरतुदीपेक्षा जास्त नाही एवढा (डिव्हिडंड) लाभांश.

19.3.3 सहकारी कायद्यातील तरतुदीनुसार शिक्षण निधी उभारणे.

**19.4** त्यानंतर उरलेल्या नफयाची वाटणी खालीलप्रमाणे होईल.

19.4.1 60% रक्कम संस्था सभासदांना संघामार्फत विकलेल्या मासळीच्या किंमतीच्या प्रमाणात त्यांना सूट (रिबेट) म्हणून वाटण्यात येईल.

19.4.2 5 % धर्मादाय फंड

19.4.3 5 % प्रचार फंड

19.4.4 5 % मत्स्यप्रक्रिया संशोधनाकरिता

19.4.5 5 % डिव्हिडंड चढउतार निधी.

19.4.6 10 % मत्स्यव्यवसाय सुधारणा फंड.

19.4.7 10 % इमारत निधी.

**19.5** निबंधकाच्या पूर्वपरवानगीशिवाय या पोटनियमात नमूद केलेल्या नफा विभागणीत फेरबदल करता येणार नाही.

**19.6** वार्षिक सर्वसाधारण सभेत लाभांश जाहीर झालेल्या तारखेपासून 6 महिन्यांच्या आत सभासद लाभांश घेऊन गेले नाही तर त्यांच्या संघाकडे असलेल्या अधिकृत पत्त्यावर त्यांच्या खर्चाने मनिऑर्डरने पाठविण्यात येईल. किंवा संघाकडे असलेल्या त्यांच्या खात्यावर जमा करण्यात येईल.

## 20 राखीव निधी आणि सर्वसाधारण राखीव निधी.

20. पोटनियम 24.1.1 प्रमाणे होणा-या रक्कमेशिवाय प्रवेश शुल्क जप्त झालेल्या भागाची रक्कम, कर्मचारी सोडून इतरांकडून वसूल केलेल्या दंडाची रक्कम, कर्जावरील दंड, व्याज इ. रक्कम राखीव निधीत जमा होईल. राखीव निधी कायदा व नियमातील तरतुदीनुसार स्वतंत्रपणे गुंतविली जाईल. मिळालेल्या देणग्या इत्यादी साधारण राखीव निधीत जमा करण्यात येतील. हया निधीचा विनियोग संचालक मंडळाच्या मंजुरीने वेळोवेळी केला जाईल.

21. संघाचे हिशोबी वर्षे हे 1 एप्रिल ते 31 मार्च असे राहील.

21.1. हिशोबी कामकाजाच्या सोयीप्रमाणे व नियम क्र. 65 मधील तरतुदीस पात्र राहून संघाचे हिशोब व पुस्तके ठेवण्यात येतील.

21.2. संघाचा कोणताही सभासद, संघाशी, त्यांच्याशी झालेल्या व्यवहाराबाबतचे दप्तर संघाच्या कार्यालयीन वेळेत पाहू शकेल.

21.3 मिळकत व येणी आणि जबाबदा-या व देणे त्याचप्रमाणे गेल्या आर्थिक वर्षातील नफा तोटा या संबंधीची पत्रके सहकारी वर्ष संपल्यानंतर 45 दिवसांचे आत तयार करण्यात येतील. या पत्रकाची एक नक्कल सहकारी संस्थांच्या हिशोब तपासणीसाकडे व नोंदणी अधिका-यांकडे पाठविण्यात येईल.

22. संलग्न संस्थांच्या पोटनियमात तरतुदीचा अभाव व चुका असल्यास किंवा कमतरता असल्यास सहकारी कायदा व नियम यास अधिन राहून संघाचे पोटनियम त्यांना अधिकृतरित्या लागू होतील.

23. शासकीय भागभांडवल घेतले असल्यास परतफेड निधी उभारावा लागेल. संघाने दरसाल आवश्यक ती रक्कम परतफेड निधीत वर्ग केली पाहिजे. वरील रकमेचा विनियोग संस्थेच्या कामकाजात न करता जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक किंवा निबंधकाच्या परवानगीने राष्ट्रीयकृत बँकेत मुदत ठेवीत गुंतवावी.

24 सर्वसाधारण सभेत हजर असलेल्या प्रतिनिधींच्या दोन तृतीयांश इतक्या बहुमतानेच या पोटनियममध्ये बदल होऊ शकेल. ते रद्द केले जाऊ शकतील किंवा नवीन पोटनियम स्वीकारले जातील. परंतु सर्वसाधारण सभा बोलविण्याच्या पूर्वसूचनेत पोटनियमात बदल करणे, ते रद्द करणे किंवा पोटनियम स्वीकारणे या संबंधीचा उल्लेख असला पाहिजे. निबंधक, सहकारी संस्था यांनी मंजूर करुन नोंदविल्याशिवाय पोटनियमातील फेरबदल अंमलात येणार नाहीत.

## 25 नोटीस लागू होणे

पोटनियमास अनुसरुन जेव्हा एखाद्या सभासदास नोटीस द्यावयाची असेल किंवा तो त्याच्या नोंदणीकृत कार्यालयाच्या अगर संघाच्या कार्यालयामध्ये जो पत्ता असेल त्या पत्त्यावर पाठविल्यानंतर ती योग्य रितीने बजावली गेली आहे असे समजण्यात येईल.

## 26 अपिल

संचालक मंडळाच्या निर्णयावर सर्वसाधारण सभेकडे अपिल करता येईल. संचालक मंडळाने आपला निर्णय कळविलेल्या तारखेपासून दोन महिन्यांच्या

आत अपिल सर्वसाधारण सभेपुढे मांडण्यासाठी संघाकडे केलेले नसल्यास सर्वसाधारणसभा अशा अपिलाचा विचार करणेबाबत नकार देईल.

27. या पोटनियमात काहीही नमुद केले असले तरी यातील तरतुदी महाराष्ट्र सहकारी कायदा नियमातील तरतुदीस अनुसरुन नसतील तर कायदा व नियमातील तरतुदी अंतिमत: ग्राहय धरण्यात येतील.

## 28. सभासदाचे प्रशिक्षण

**सहकारी संस्थाच्या सभासदाचे सहकार कायदा विषयक आणि संस्थेच्या व्यवहारासंबंधी प्रशिक्षण घेणे अनिवार्य आहे. कायदा कलम 24 (अ) मध्ये नमुद केल्याप्रमाणे विहीत कालावधीत संस्था संचालक व सभासदांचे सहकार कायदा व संस्थेच्या व्यवहारासंबंधीचे प्रशिक्षण पूर्ण होईल. याची जबाबदारी संस्था संचालक व व्यवस्थापक याची राहील. सदर प्रशिक्षणाकरिता संस्था, राज्यशिखर संस्था/राज्यसहकारी संस्थेकडे शासनाने ठरविलेल्या दराने निधी जमा करेल**

24 **क.** (1) **संस्था, राज्य शासन, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशा, राज्य संघीय संस्थांमार्फत किंवा राज्य शिखर प्रशिक्षण संस्थामार्फत आपले सदस्य, अधिकारी आणि कर्मचारी यांच्याकरिता सहकार शिक्षण व प्रशिक्षण आयोजित करील. अशा शिक्षणामुळे व प्रशिक्षणामुळे**

**(एक) संस्थेच्या व्यवस्थापनामध्ये सदस्यांचा प्रभावी व सक्रीय सहभाग सुनिश्चित होईल.**

**(दोन) नेतृत्व कार्यासाठी बुध्दिवान कर्मचारी शिकून कुशल बनतील.**

**(तीन) सहकार शिक्षण व प्रशिक्षण यांमुळे व्यावसायिक कौशल्य विकसित होईल.**

2. **निवडून आलेला किंवा स्वीकृत केलेला समितीचा प्रत्येक सदस्य, विहित करण्यात येईल, असे सहकार शिक्षण व प्रशिक्षण, अशा कालावधीकरिता आणि अशा कालांतराने घेईल.**

3. **संस्था, पोट-कलम** (1) **अन्वये अधिसूचित केलेल्या, राज्य संघीय संस्थांच्या किंवा राज्य शिखर प्रशिक्षण संस्थांच्या शिक्षण व प्रशिक्षण निधीत विहित करण्यात येईल अशा दराने दरवर्षी अंशदान करील, आणि वेगवेगळया संस्थांकरिता किंवा संस्थांच्या वर्गांकरिता वेगवेगळे दर विहित करण्यात येतील.**

## 29. तक्रार निवारण समिती

**संस्थेच्या सभासदांमधील तसेच सभासद व संस्थेमधील वाद, तक्रारी सोडविण्यासाठी संस्था स्तरावर वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये तक्रार निवारण समितीची नेमणुक करण्यात येईल.**

**तक्रार निवारण समितीची रचना खालीलप्रमाणे असेल-**

1. सदर समिती त्रिसदस्यीय राहील (क्रियाशिल सभासदांमधुन) यातील एक व्यक्तीही अध्यक्ष व अन्य दोन व्यक्ती समितीचे सदस्य म्हणून काम करतील.

समितीचे अध्यक्ष हे संस्थेचे वरिष्ठ सभासद व संस्थेच्या कामकाजाचे ज्ञान असलेले असावे. तसेच समितीचे उर्वरित दोन सदस्य हे सहकारातले तज्ञ असावेत किंवा जिल्हा बँकेच्या कामकाजाबाबत अनुभवी सभासद असावा.

2. संस्थेचा एक वरीष्ठ अधिकारी/सचिव, समितीचा सदस्य सचिव म्हणून काम पाहील व समितीत

3. या कामकाजाची नोंद ठेवण्याचे काम तो करेल.

समितीचा कालावधी नियुक्तीपासून 1 वर्षाचा अथवा पुढील वार्षिक सर्वसाधारण सभेपर्यंत राहील.

कार्यव्याप्ती:- समिती संस्थेच्या सभासदांमधील किंवा सभासद व संस्थेमधील व्यवसायासंदर्भात व व्यवस्थापना संदर्भातील वाद किंवा तक्रारी यांचे निवारण करेल. प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने संबधितास सुनावणी देऊन व संबधितांचे म्हणणे ऐकून घेऊन तीन महिन्यांच्या आत तक्रारींचे निराकरण करणे आवश्यक राहील. सदर समितीची कर्तव्य म्हणजे त्यांच्यासमोर आलेल्या वादामध्ये संस्थेस योग्य तो सल्ला देण्याबरोबरच कायदा/नियम, संस्थेचे उपविधी व सहकार खात्याचे आदेश व मार्गदर्शक तत्वे तसेच उपविधी व सहकार खात्याचे आदेश व मार्गदर्शक तत्वे तसेच

**संस्था आणि सहकार क्षेत्रातील रुढी यांचा विचार करुन सभासदत्व संस्था यांचेमध्ये तडजोड घडवून आणणे. सदर समितीने इतिवृत्तास संचालक मंडळ सभेस मान्यता घेणे आवश्यक राहील. संचालक मंडळ समितीच्या मान्यतेनंतरच या समितीच्या निर्णयावर अंतिम कार्यवाही होईल.**

## 30. उपविधी लागू होणे

**संस्था यापूर्वीचे नोंदली असल्यास हे उपविधी मंजूर होवून आल्यानंतर या पूर्वीचे अंमलात असलेले सर्व उपविधी रद्द झालेत असे समजले जाईल.**